24 Nov 2026_Layout 1 11/23/2026 11:30 PM Page 1

बीड, परभणी, लातूर, धाराशिव, जालना, नांदेड, मुंबई, पुणे, छत्रपती संभाजीनगर.... या जिल्हयात एकाचवेळी प्रकाशित होणारे

नोव्हेंबर / November
मंगळवार / Tuesday
दि.२४ / Dt: 24
२०२६ / 2026

महाराष्ट्रातील आघाडीचे दैनिक

# जगमित्र

सत्य | निष्पक्ष | निर्भीड | सर्वसमावेशक

आजचा अंक ६ पाने Pages 6

किंमत ३ रूपये Price 3 rupees

Jagmitra2010@gmail.com मुख्य संपादक : बालासाहेब कडबाने 9423912525 निवासी संपादक : मकरंद जहागीरदार 9422216061 www.jagmitra.com

बीड/Beed • वर्ष १७ वे/Year 17 • अंक ३२/Issue 32 • आरएनआय नं.एमएचएमएआर/२०११/३८८१४ /RNI.No.MAHMAR/2011/38814

# दिवसा खुर्च्या रिकाम्या, रात्री दारूच्या पार्ट्या; महावितरण कार्यालयाचा झाला मद्यपींचा अड्डा!

दुपारी ३ वाजताच कार्यालयाला कुलूप, रात्री रंगतात ओल्या पार्ट्या; बीडच्या महावितरण कार्यालयात नेमकं चाललंय तरी काय?

**खाकीचा धाक उरलाय की नाही? शासकीय कार्यालयात मद्यपींचा सुळसुळाट; पोलिसांच्या रात्रीच्या गस्तीवर प्रश्नचिन्ह**

## पोलिसांच्या गस्तीवर प्रश्नचिन्ह; टवाळखोरांना मोकळे रान कोणाचे?

*महावितरणच्या या कार्यालयात रात्रीच्या वेळी दारूच्या पार्ट्या रंगत असल्याचा स्थानिकांचा आरोप आहे. याबाबत महावितरणच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना विचारणा केली असता, ''रात्रीच्या वेळी बाहेरचे टवाळखोर येऊन येथे दारू पितात,'' असे उत्तर देऊन त्यांनी आपली जबाबदारी झटकली आहे. जर शासकीय कार्यालयाच्या आवारात रात्रीच्या वेळी टवाळखोर बिनधास्तपणे शिरून दारू पित असतील, तर हा प्रकार कायदा व सुव्यवस्थेला थेट आव्हान देणारा आहे. बीड शहर पोलिसांची रात्रीची गस्त नेमकी कुठे असते? असा सवाल आता उपस्थित केला जात आहे.*

## ग्राहकांना शॉक अन् साहेबांना किक! माळीवेस महावितरण कार्यालयात दारूच्या बाटल्यांचा खच





**ग्राहकांचा आक्रमक पवित्रा आणि मागण्या:** महावितरणच्या या अनागोंदी कारभाराविरोधात ग्राहकांनी आता आक्रमक पवित्रा घेतला असून वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे खालील ठोस मागण्या केल्या आहेत. कार्यालयातील सीसीटीव्ही फुटेजची तात्काळ तपासणी करून दुपारीच पळ काढणारे अधिकारी आणि रात्री दारू पार्ट्या करणारे तळीराम कोण आहेत, याचा पर्दाफाश करावा.शहर आणि ग्रामीण अतिरिक्त कार्यकारी अभियंता यांनी या प्रकरणात तातडीने लक्ष घालून सर्व पथकातील सहायक अभियंता यांना कारणे दाखवा नोटीस बजावावी. कर्तव्यात कसूर करणाऱ्या आणि कार्यालयाची प्रतिमा मलिन करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर तात्काळ निलंबनाची व शिस्तभंगाची कारवाई करावी.आता महावितरणचे वरिष्ठ अधिकारी या तळीराम आणि कामचुकार कर्मचाऱ्यांना पाठीशी घालतात की त्यांच्यावर कठोर कारवाई करून सत्य जनतेसमोर आणतात, याकडे संपूर्ण शहराचे लक्ष लागले आहे.

**बीड/जगमित्र न्यूज**

माळीवेस येथील महावितरण शहर उपविभाग कार्यालयाच्या मनमानी आणि भोंगळ कारभाराचा कळस गाठला असून, हे कार्यालय सर्वसामान्य ग्राहकांच्या सेवेसाठी नसून अधिकाऱ्यांच्या आरामासाठी आणि रात्रीच्या तळीरामांच्या अड्ड्यासाठी बनले आहे की काय, असा संतप्त सवाल नागरिक विचारत आहेत. एकीकडे वीजपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी तांत्रिक कर्मचारी (लाइनमन आणि ऑपरेटर) २४ तास तीन शिफ्टमध्ये आपला जीव धोक्यात घालून काम करत आहेत. दुसरीकडे मात्र, कार्यालयीन अधिकारी आणि कर्मचारी नियमांना केराची टोपली दाखवत आहेत. महावितरणच्या नियमानुसार सकाळी १०:०० ते दुपारी २:०० आणि जेवणाच्या सुट्टीनंतर दुपारी २:३० ते सायंकाळी ६:१५ वाजेपर्यंत अधिकाऱ्यांनी कार्यालयात हजर राहणे बंधनकारक आहे. मात्र, प्रत्यक्ष परिस्थिती अत्यंत संतापजनक आहे. अनेक अधिकारी दुपारच्या जेवणानंतर म्हणजेच २:३० ते ३:३० च्या सुमारास कार्यालयाला थेट कुलूप ठोकून पळ काढतात. काही कर्मचारी तर कार्यालयात पायही न ठेवता पूर्ण दिवसाचा पगार लाटत असल्याचा गंभीर प्रकार समोर येत आहे. अधिकारीच जागेवर नसल्याने वीजबिलाच्या तक्रारी, नवीन जोडणी किंवा इतर कामांसाठी आलेल्या सामान्य ग्राहकांना नाहक चकरा माराव्या लागत आहेत.या भोंगळ कारभारात भर म्हणजे, महावितरणच्या या कार्यालयाच्या आवारात आणि आतमध्ये दारूच्या रिकाम्या बाटल्या, युज अँड थ्रो ग्लास आणि दारूच्या बाटल्यांची हजारो झाकणे अस्ताव्यस्त पडलेली दिसून येत आहेत. शासकीय कार्यालयाची ही दुरवस्था पाहून नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.या प्रकाराबाबत स्थानिक नागरिकांना विचारले असता, रात्रीच्या वेळी खुद्द अधिकारी आणि कर्मचारीच येथे दारूच्या पार्ट्या झोडत असल्याचा खळबळजनक आरोप नागरिकांनी केला आहे. मात्र, याबाबत संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांकडे विचारणा केली असता, ''रात्रीच्या वेळी बाहेरचे टवाळखोर येऊन येथे दारू पितात,'' असे उडवाउडवीचे आणि जबाबदारी झटकणारे उत्तर त्यांनी दिले आहे. शासकीय कार्यालयाच्या आवारात टवाळखोर शिरतातच कसे? आणि रात्रीच्या शिफ्टमधील कर्मचाऱ्यांच्या नजरेसमोर हे कसे घडते? असे अनेक प्रश्न यातून उपस्थित होत आहेत.

**शासकीय कार्यालय आहे की दारूचा गुत्ता? माळीवेस महावितरणमधील तळीरामांना अभय कोणाचे?**

**अधिकाऱ्यांचा कामचुकारपणा की टवाळखोरांचा अड्डा? महावितरणच्या कारभाराने गाठला निर्लज्जपणाचा कळस!**

## बीड शहर पोलिसांकडून नागरिकांच्या ठोस अपेक्षा..

*महावितरणचे वरिष्ठ अधिकारी या प्रकरणावर पांघरूण घालण्याची शक्यता असल्याने आता बीड शहर पोलिसांनीच या प्रकरणात स्वतःहून लक्ष घालावे, अशी मागणी जोर धरत आहे माळीवेस महावितरण कार्यालय आणि परिसरात बीड शहर पोलिसांनी रात्रीच्या वेळी विशेष गस्त वाढवून मद्यपींवर धडक कारवाई करावी. कार्यालयातील सीसीटीव्ही फुटेज पोलिसांनी तपासावे, जेणेकरून रात्रीच्या वेळी येथे दारू पिणारे बाहेरचे टवाळखोर आहेत की शासकीय कर्मचारी, हे स्पष्ट होऊन संबंधितांवर गुन्हे दाखल करता येतील. शासकीय कार्यालयाच्या आवारात असे गैरप्रकार घडत असताना दुर्लक्ष करणाऱ्या महावितरणच्या स्थानिक प्रमुखांना पोलिसांनी सुरक्षेच्या दृष्टीने समज द्यावी. शासकीय कार्यालयाचे पावित्र्य राखण्यासाठी आणि टवाळखोरांचा बंदोबस्त करण्यासाठी बीड शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक या गंभीर प्रकाराची दखल घेऊन कधी कारवाईचा बडगा उगारणार, याकडे संपूर्ण बीड शहराचे लक्ष लागले आहे.*

## जलसंधारणातून जलसमृद्धीकडे; वडखेल येथे नवीन विहिरीचे भूमिपूजन



**परळी वैजनाथ/प्रतिनिधी**

पावसाने ओढ दिल्यामुळे शेतकऱ्यांसमोर पिकांचे नुकसान, पाणीटंचाई, जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न आणि पिण्याच्या पाण्याची उपलब्धता अशा अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. दुष्काळाचे संकट केवळ शेतीपुरते मर्यादित नसून त्याचा परिणाम शेतकरी कुटुंबांसह संपूर्ण ग्रामीण अर्थव्यवस्थेवर होत आहे. त्यामुळे जलसंधारणाच्या माध्यमातून पाण्याची उपलब्धता वाढविणे, पाणी अडविणे आणि पाणी जमिनीत जिरविणे ही काळाची गरज आहे. शेतकऱ्यांचे दुःख आणि त्यांच्या समस्या या आपल्याच समस्या असून, या कठीण काळात शेतकऱ्यांना वाऱ्यावर न सोडता त्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहून दुष्काळ निवारणासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणार असल्याचे प्रतिपादन वडखेलचे सरपंच प्रतिनिधी रत्नाकर देवकते यांनी केले.

वडखेल येथे शेतकरी लखन गोविंदराव आगलावे यांच्या नवीन विहिरीचे भूमिपूजन करण्यात आले. दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी तसेच शेतीसाठी पाण्याची उपलब्धता निर्माण व्हावी, या उद्देशाने करण्यात **(पान २ वर)**

## निविदा जाहिरातींच्या वाटपात पक्षपात? धारूर नगरपरिषदेच्या कारभाराची चौकशी करा!

**ठरावीक दैनिकांनाच वारंवार प्राधान्य; इतर वृत्तपत्रांवर अन्याय होत असल्याचा आरोप अतुल शिनगारे यांचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन**

**धारूर/अतूल शिनगारे**

धारूर नगरपरिषदेमार्फत विविध विकासकामांच्या निविदा प्रसिद्ध करण्यासाठी वृत्तपत्रांना दिल्या जाणाऱ्या जाहिरातींच्या वाटपात पक्षपात होत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. काही ठरावीक दैनिकांनाच वारंवार जाहिराती देऊन इतर पात्र व नोंदणीकृत वृत्तपत्रांना डावलले जात असल्याची बाब समोर आणत या संपूर्ण प्रक्रियेची चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

यासंदर्भात व्हॉइस ऑफ मीडियाचे धारूर तालुकाध्यक्ष अतुल शिनगारे यांनी जिल्हाधिकारी, बीड यांच्याकडे मुख्याधिकारी, धारूर नगरपरिषद यांच्यामार्फत निवेदन सादर केले आहे.

नगरपरिषदेकडून शहरातील विविध विकासकामांच्या निविदांसाठी वृत्तपत्रांमध्ये जाहिराती प्रसिद्ध केल्या जातात. मात्र,




जाहिरातींचे वाटप कोणत्या निकषांवर केले जाते, याबाबत पारदर्शकता दिसून येत नसल्याचा आक्षेप निवेदनात घेण्यात आला आहे. मोजक्याच दैनिकांना वारंवार प्राधान्य देण्यामागे कोणाचे हितसंबंध आहेत का, तसेच या प्रक्रियेत अधिकारी किंवा कर्मचाऱ्यांचा हस्तक्षेप आहे का, याची सखोल चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.नगरपरिषदेने मागील तीन वर्षांत प्रसिद्ध केलेल्या सर्व निविदा जाहिरातींची दैनिकनिहाय माहिती सार्वजनिक करावी, प्रत्येक वृत्तपत्राला किती जाहिराती देण्यात आल्या याचा तपशील जाहीर करावा, तसेच जाहिरात वितरणात शासनाच्या नियमांचे पालन झाले आहे का, याची पडताळणी करावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.शासकीय जाहिरातींचे वाटप करताना सर्व पात्र वृत्तपत्रांना समान संधी मिळणे आवश्यक आहे. लोकशाहीच्या चौथ्या स्तंभातील वृत्तपत्रांमध्ये भेदभाव न करता पारदर्शक पद्धतीने जाहिरातींचे वितरण करावे. अनियमितता किंवा अधिकाराचा गैरवापर आढळल्यास संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणी अतुल शिनगारे यांनी नगरपरिषदेला मेलद्वारे निवेदन देऊन केली आहे.

## सिरसाळ्यात अव्वाच्या सव्वा वीज बिलाविरोधात युवासेनेचा एल्गार



**सिरसाळा/प्रतिनिधी**

सिरसाळा शहरातील नागरिकांना गेल्या काही महिन्यांपासून अव्वाच्या सव्वा वीज बिले येत असल्याने नागरिक त्रस्त झाले आहेत शिवसेना जिल्हा संपर्कप्रमुख श्री मनोजजी शिंदे साहेब युवासेना मराठवाडा निरीक्षक बाजीराव दादा चव्हाण युवासेना जिल्हाप्रमुख ऋषिकेश भैया लोमटे युवासेना विधानसभाप्रमुख कैलास कावरे यांच्या मार्गदर्शनाखाली व युवासेना शहरप्रमुख उमेश सोळंके नेतृत्वाखाली आज महावितरण कार्यालय, सिरसाळा येथे कनिष्ठ अभियंता यांना निवेदन देण्यात आले.

नागरिकांना बेसिक वीज बिलांऐवजी वापरापेक्षा कित्येक पटीने जास्त बिल पाठविले जात असल्याने नागरिकांवर मोठा आर्थिक बोजा पडत आहे, असे निवेदनात म्हटले आहे. सध्या मराठवाड्यात भीषण दुष्काळाची परिस्थिती आहे. शेती पिके करपली आहेत, मजुरी नाही, पिण्याच्या पाण्याची **(पान २ वर)**

## जिरेवाडीतील जलसंधारण बैठक संपन्न

**२९ नोव्हेंबर रोजी सिरसाळा येथे प्रशिक्षणाचे निमंत्रण**

**जिरेवाडी/प्रतिनिधी**

गावातील भूजल पातळी वाढवणे आणि जलसंधारणाच्या कामांना गती देण्याच्या उद्देशाने जिरेवाडी येथे ग्लोबल विकास ट्रस्ट (Global Vikas Trust - GVT) च्या प्रतिनिधींसोबत महत्त्वाची बैठक आज रविवार, दि. २२ नोव्हेंबर २०२६ रोजी श्री हनुमान मंदिरात उत्साहात पार पडली. या बैठकीत ग्लोबल विकास ट्रस्टच्या प्रतिनिधींनी गावातील पाण्याच्या हिताचे विषय तसेच जलसंधारणाच्या कामाचे स्वरूप सविस्तरपणे समजावून सांगितले आणि भूजल पातळी वाढवण्यासाठी पुढे कोणत्या उपाययोजना व कामे करायची, याबाबत मार्गदर्शन केले. शेतकऱ्यांना अधिक सखोल प्रशिक्षण मिळावे आणि पुढील नियोजन करता यावे, यासाठी दिनांक २९ नोव्हेंबर २०२६ (२९.११.२०२६) रोजी सकाळी ठीक ११:०० वाजता सिरसाळा येथील ग्लोबल विकास ट्रस्टच्या मुख्य कार्यालयात येण्याचे निमंत्रण ग्रामस्थांना व शेतकऱ्यांना देण्यात आले आहे. या बैठकीस गावचे सरपंच गोवर्धन कांदे, उपसरपंच राहुल कांदे, ग्रामपंचायत सदस्य नारायण गित्ते, सहदेव कांदे, श्रीधर मुंडे, दिगंबर मुंडे, पाटलोबा मुंडे, अंकुश कांदे, श्री.बालासाहेब कांदे, रवी मुंडे, विष्णू मुंडे, नानाभाऊ मुंडे, महेश मुंडे, विनोद पारधे, राजाभाऊ मुंडे, सुनील कांदे यांच्यासह गावातील शेतकरी बांधव, तरुण व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. गावाच्या जलसमृद्धीसाठी ग्रामस्थांनी दिलेल्या सकारात्मक प्रतिसादाबद्दल मनःपूर्वक आभार व्यक्त करत २९ नोव्हेंबर रोजी होणाऱ्या प्रशिक्षणासाठी इच्छुक शेतकरी व ग्रामस्थांनी वेळेत उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

**सोनाई कारखान्याचा २९०० रु प्रमाणे २० ते ३१ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत**

## गेलेल्या ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या ऊसाचा हप्ता महेश बँकेत वर्ग!



**परळी वैजनाथ/प्रतिनिधी**

सोनाई अँग्रो कारखान्याचे चेअरमन प्रा.टी.पी.मुंडे सरांच्या मार्गदर्शनाखाली कारखान्याचा २९०० रुपये प्रति टनाप्रमाणे ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या ऊसाचा हप्ता दिनांक २० ते ३१ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत कारखान्यास ऊस गेलेल्या शेतकऱ्यांचा ऊसाचा हप्ता महेश को-ऑपरेटिव्ह बँक शाखा परळी वैजनाथ येथे वर्ग करण्यात आल्याची माहिती कारखान्याचे व्हाईस चेअरमन आत्माराम कराड व संचालक प्रा. विजय मुंडे दिली आहे.

कारखाना सुरू झाल्यापासून ३१ ऑक्टोबर महिन्याच्या तारखेपर्यंत शेतकऱ्यांच्या ऊसाची बीले बँकेत वर्ग करण्यात आली आहेत त्यामुळे परिसरातील शेतकरी बांधव आनंद व्यक्त करत आहेत .तरी ऊस उत्पादक शेतकरी बांधवांनी आपली रक्कम महेश को-ऑपरेटिव्ह बँकेतून घेऊन जावी असे कारखान्याच्या वतीने कळविण्यात आले आहे.

## घागरवाड्यात बिबट्याची दहशत; गाईवर हल्ला करून ठार

**धारूर/अतूल शिनगारे**

धारूर तालुक्यातील घागरवाडा परिसरात बिबट्याचा वावर वाढल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. रविवारी (दि. २२ नोव्हेंबर) दुपारी बिबट्याने शेतातील गाईवर हल्ला करून तिला ठार केले. या घटनेमुळे शेतकरी आणि पशुपालकांमध्ये चिंतेचे वातावरण पसरले आहे.

घागरवाडा येथील शेतकरी बन्सी पांडुरंग नाईकवाडे यांची गाय बिबट्याच्या हल्ल्यात ठार झाली. शेतशिवारात बिबट्याचा वावर असल्याने शेतकऱ्यांना शेतीची कामे करताना



तसेच जनावरांची देखभाल करताना जीव मुठीत धरून राहावे लागत आहे. विशेषतः शेतात जाणाऱ्या नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर बनला आहे. दरम्यान, चार दिवसांपूर्वी धारूरजहागीरमोहा परिसरातही **(पान २ वर)**

महाराष्ट्रातील आघाडीचे दैनिक

# जगमित्र

गोविंदसिंह राजपुत (जिल्हा प्रतिनिधी) मो. 9921876500 PRGI.NO.MHMAR/26/A0224

धाराशिव जिल्हा आवृत्ती मंगळवार दि.२४ नोव्हेंबर २०२६ पान नं. २

आता संभाजी नगर, पुणे, मुंबई येथे जाण्याची गरज नाही

मुळव्याध : संडासच्या जागी आग होणे, दुखणे, कोंब येणे, रक्त जाणे, जागा लहान होणे, फिशर

सांधेदुखी : पाठीच्या मणक्याचे त्रास, चमक मारणे, गॅप पडणे, गुडघे दुखी, टाचदुखी, मानपाठ, कंबरदुखी, हातपायाला मुंग्या येणे, नस दबणे, डोकेदुखी, अंग दुखणे,

स्त्रीयांचे सर्व आजार : मुल बाळ होत नसल्यास वजन जास्त असणे, केस गळणे, चक्करयेणे, घबराहट, बैचेनी, झोप न येणे, पचनाचे व पित्ताचे त्रास, पोटदुखी, हाडीताप, मुतखडा, त्वचारोग, ॲलर्जि सर्दी, खोकला, दमा.

रविवारी दवाखाना बंद राहील

डॉ.रविंद्र ईटके
आयुर्वेद व पंचवर्ग तज्ञ (पुणे)

डॉ.सौ.भाग्यश्री ईटके
स्त्रीरोग व आयुर्वेद तज्ञ

वेळ : स. ११ ते २.३० संध्या : ६ ते ८
सोनोग्राफी सेंटर समोर पदमावती गल्ली, परळी. वै
मो.9822816010, 7588596838

विश्वश्री : आयुर्वेद हॉस्पिटल व पंचकर्म केंद्र




## राजकारण जनसेवेचे की सत्तेच्या खुर्चीचे?

जनतेच्या प्रश्नांपेक्षा सत्तेची समीकरणे मोठी ठरू लागली, ही लोकशाहीसमोरील चिंतेची बाब!

आजचे राजकारण पाहिले की एक प्रश्न प्रकर्षाने जाणवतो, राजकारण नेमके कोणासाठी सुरू आहे? सर्वसामान्य जनतेसाठी की सत्तेच्या खुर्चीसाठी? लोकशाहीत राजकारण हे जनसेवेचे माध्यम असायला हवे; मात्र आज सत्तेची समीकरणे, पक्षांतर, युती-आघाड्या, आरोप-प्रत्यारोप आणि राजकीय स्वार्थ यांच्याभोवतीच राजकीय वर्तुळ फिरताना दिसते. जनतेच्या मूलभूत प्रश्नांपेक्षा कोण कोणासोबत जाणार, कोण कोणाला सोडणार आणि कोणाची सत्ता टिकणार, याच चर्चांना अधिक महत्त्व मिळत आहे. निवडणुका जवळ आल्या की प्रत्येक नेता जनतेचा सेवक असल्याचा आव आणतो. गावोगावी दौरे होतात, हात जोडले जातात, आश्वासनांची खैरात केली जाते. विकासाचे स्वप्न दाखवले जाते. मात्र निवडणुका संपल्या की अनेक आश्वासने कागदावरच राहतात. सामान्य माणसाला आपल्या प्रश्नांसाठी कार्यालयांचे उंबरठे झिजवावे लागतात. मग प्रश्न असा पडतो की लोकप्रतिनिधी निवडून येतात ते जनतेची कामे करण्यासाठी की पुढील निवडणुकीची तयारी करण्यासाठी? आज पक्षांची विचारधारा, तत्त्वनिष्ठा आणि राजकीय भूमिका यापेक्षा सत्तेतील सहभाग महत्त्वाचा ठरत असल्याची चर्चा वारंवार होते. कालपर्यंत एकमेकांवर कठोर टीका करणारे नेते आज एकाच व्यासपीठावर दिसतात. राजकीय युती आणि आघाड्या हा लोकशाहीचा भाग असू शकतो; परंतु त्यामागील भूमिका जनतेसमोर स्पष्ट असली पाहिजे. केवळ सत्तेच्या गणितासाठी राजकीय भूमिका बदलत असतील, तर मतदारांच्या विश्वासाचे काय? राजकीय व्यासपीठांवर मोठमोठ्या घोषणा होतात; पण शेतकऱ्यांच्या शेतमालाला योग्य भाव, पिकांचे नुकसान, कर्जाचा प्रश्न, पाणीटंचाई, बेरोजगार तरुणांच्या हाताला काम, महिलांची सुरक्षितता, महागाई आणि शिक्षणाचा वाढता खर्च या प्रश्नांवर ठोस आणि परिणामकारक काम किती होते, याचा हिशेब जनतेला मिळायला हवा.

# दिशा बैठकीत ''अंधारे'' च्या पुढे ''काजवे'' चा थरथराट...

**धाराशिव/प्रतिनिधी**

धाराशिव नगरपरिषदेचा कारभार किती पारदर्शक आणि वेगाने सुरू आहे.याकडे धाराशिव चे खासदार ओमप्रकाश राजे निंबाळकर यांनी लक्ष वेधले. २३ नोव्हेंबरला दिशा समितीच्या बैठकीत, ''अंधारे'' च्या पुढे ''काजव्यांचा'' थयथयाट पाहायला मिळाला.



धाराशिव नागरी समस्या शहरात कायम आहेत, विविध कामाच्या निविदा प्रक्रिया वेळेत पूर्ण होत नाहीत. मुख्याधिकारी श्रीमती नीता अंधारे या हुकूमशाही पद्धतीने आणि जहागीरदारी असल्यागत नगरपालिकेचा कारभार चालवत असल्याचा ठपका खासदारांनी भर सभेत ठेवला. नगरपालिकेच्या अध्यक्षांना न जुमानता, मुख्याधिकाऱ्याच्या मनमर्जीने कामकाज सुरू आहे. सामान्य जनता त्रस्त आहे. मी खासदार आहे ती माझ्या बापाची इस्टेट,जहागिरी नाही.याचे भान अधिकाऱ्यांनी ठेवायला हवे.तुमचा कारभार अत्यंत गचाळ आणि जनतेला त्रासदायक असल्याचे खासदारांनी भर सभेत सांगितले. धाराशिव नगरपरिषदेच्या कामकाजाचा पंचनामा आणि कार्यपद्धतीचे वाभाडे काढले. तब्बल दहा मिनिटं धाराशिव नगरपालिकेच्या कारभारावर टीकास्त्र सोडत खासदारांनी तीव्र नाराजी व्यक्त केली.

जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी प्रियवंदा महादळकर,आमदार कैलास पाटील यांच्या उपस्थितीत, दिशा बैठक घेण्यात आली.

# येडशीच्या कारंडे कुटुंबीयांना, विशेष बाब म्हणून मदतीसाठी पाठपुरावा करणार-सरनाईक

**धाराशिव/प्रतिनिधी**

येडशी मधील जळीत घटना अपघात आहे.यामध्ये विशेष बाब मधून आपण मदतीसाठी पाठपुरावा करणार असल्याची माहिती, राज्याचे परिवहन मंत्री तथा धाराशिव जिल्ह्याचे पालकमंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली. यासंदर्भात २३ नोव्हेंबरला वृत्त प्रकाशित करण्यात आले होते. मीरा-भाईंदर येथे पत्रकार मोईन सय्यद यांनी येडशीच्या घटनेकडे लक्ष वेधले.

येडशी येथे आगीच्या विळख्यात,करंडे कुटुंबातील सहा जणांचा ९ नोव्हेंबरला दुर्दैवाने मृत्यू झाला. या घटनेला पंधरा दिवसाचा कालावधी होत आहे. या अपघाताबद्दल शासनाची कोणतीही मदती संदर्भात गाईडलाईन नाही.असे सरनाईक



म्हणाले.करंडे कुटुंबीयांना मदत करण्यासाठी आपण स्वतः जिल्हाधिकाऱ्यांना खास बाब म्हणून मदत करण्याची सूचना केली.तसा प्रस्ताव शासनाकडे पाठवण्याची सूचना केली. आणि आता त्यांना मदत मिळावी यासाठी आपण पाठपुरावा करणार असल्याची भूमिका आता सरनाईक यांनी व्यक्त केली आहे.

# पीक विम्याचे श्रेय शेतकऱ्यांना समर्पित करतो-माजी आ.चौगुले

**धाराशिव/प्रतिनिधी**

२०२० मध्ये जिल्ह्यात अतिवृष्टी झाल्याने खरीप हंगामातील पिकांचे नुकसान झाले होते. शेतकऱ्यांचे नुकसान झालेले असताना तांत्रिक कारण पुढे करून पिक विमा कंपनीने शेतकऱ्यांचा हक्काचा विमा नाकारला होता. शेतकऱ्यांना न्याय देण्यासाठी सर्वप्रथम मी लोकप्रतिनिधी म्हणून सर्वप्रथम सर्वोच्च न्यायालयामध्ये २०२० साली याचिका दाखल केली. या याचिकेला यश आले आणि मिळालेल्या पीक विम्याचे श्रेय शेतकऱ्यांना समर्पित करत असल्याची भावना माजी आमदार ज्ञानराज चौगुले यांनी धाराशिव येथे पत्रकार परिषदेमध्ये व्यक्त केली.

आमदार असल्यामुळे पिक विमा याची केस संदर्भात मी स्टंटबाजी करता की काय ? असे म्हणत न्यायालयाने मला ४ लाख रुपये डिपॉझिट भरण्यासाठी सांगितले. ती रक्कम मी सर्वोच्च न्यायालयामध्ये डिपॉझिट डिपॉझिट म्हणून जमा केली. तेव्हापासून माझा न्यायालयात शेतकऱ्यांसाठी लढा सुरू होता. त्या याचिकेचा निकाल लागला असून शेतकऱ्यांना २२७ कोटी रुपये येत्या १५ दिवसांत संबंधित शेतकऱ्याच्या बँक खात्यावर जमा होतील. मात्र, या निकालाचे श्रेय घेण्याची स्पर्धा लागल्याचे त्यांनी सांगितले. पत्रकार परिषदेला शेतकरी नेते अनिल जगताप, तुळजापूर माजी तालुकाप्रमुख अमोल जाधवसह पदाधिकारी उपस्थित होते.

पुढे बोलताना चौगुले म्हणाले की, २०२० साली मोठ्या प्रमाणात अतिवृष्टी झाल्यामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान झाले होते. त्यावर्षी प्रधानमंत्री पीक विमा योजनेअंतर्गत जिल्ह्यातील ९

# समर्थ क्लासेसच्या २०२७ दिनदर्शिकेचे प्रकाशन

**जळकोट/विजय पिसे**

तुळजापूर तालुक्यातील जळकोट येथील समर्थ क्लासेसच्या २०२७ च्या दिनदर्शिकेचे प्रकाशनअक्कलकोट येथील श्री वटवृक्ष स्वामी समर्थ महाराज देवस्थानचे चेअरमन मा. महेश इंगळे साहेब यांच्या शुभहस्ते समर्थ क्लासेसच्या २०२७ सालच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन करण्यात आले.



दरवर्षीप्रमाणे याही वर्षी समर्थ क्लासेसच्या दिनदर्शिका चे प्रकाशन अक्कलकोट येथील स्वामी समर्थांच्या मंदिरामध्ये प्रकाशित करण्यात आले.यावेळी समर्थ क्लासेसचे संचालक रामशेट्टी पाटील सर, प्रथमेशजी इंगळे, हर्षद स्वामी, ओम जिरगे, सागर राजमाने, बालाजी पालमपल्ले व सचिन माळगे उपस्थित होते.

**पान १ वरून....**

**भूमिपूजन**

येणारे असे उपक्रम शेतकऱ्यांसाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहेत. जलसंधारणातून जलसमृद्धीकडे वाटचाल करत असून, गावात पाण्याची उपलब्धता वाढविण्यासाठी प्रयत्न होणे आवश्यक आहे. यावेळी सरपंच प्रतिनिधी रत्नाकर देवकते, गोविंद देवकते, पवन बोडके, बालासाहेब आगलावे, माऊली महाराज आगलावे, शिवाजी बोडके (पाटील), संतराम देवकते, गोविंद खरात, विठ्ठल देवकते, गोविंद रामभाऊ आगलावे, मंचका कोचे, समाधान बोराडे, सोनाजी आगलावे, पप्पू घुमरे, गोविंद अण्णा आगलावे यांच्यासह ग्रामस्थ व शेतकरी उपस्थित होते.

.....

**युवासेनेचा एल्गार**

टंचाई आहे. अशा परिस्थितीत चुकीचे व अव्वाच्या सव्वा बिल भरणे नागरिकांना अजिबात शक्य नाही, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

**१. सिरसाळा शहरातील सर्व नागरिकांना बेसिक वीज बिले देण्यात यावीत. २. चुकीचे / जास्त आलेले बिल तात्काळ रद्द करून दुरुस्त बिल देण्यात यावे. ३. दुष्काळी परिस्थिती लक्षात घेऊन घरगुती ग्राहकांनाही दिलासा देण्यात यावा व दुरुस्त बिलातील शिल्लक रक्कम भरण्यासाठी नागरिकांना पुरेसा वेळ द्यावा. ४. जोपर्यंत बिल दुरुस्त होत नाही, तोपर्यंत कोणाचाही वीज पुरवठा खंडित करण्यात येऊ नये.**

यावेळी युवासेनेचे सिरसाळा शहर प्रमुख उमेश सोळंके शिवसेना उपशहर प्रमुख विष्णू ढेंबरे शिवसेना विभागप्रमुख संपत शिंदे गोपाळ कावरे यांच्यासह शिवसैनिक युवा सैनिक पदाधिकारी उपस्थित होते.

**बिबट्याची दहशत**

बिबट्या दिसल्याची घटना समोर आली होती. त्यानंतर आता घागरवाडा येथे गाईवर हल्ला झाल्याने परिसरातील गावांमध्ये बिबट्याच्या वावराबाबत भीती अधिकच वाढली आहे. वनविभागाने या घटनेची तातडीने दखल घेऊन घागरवाडा परिसरात पाहणी करावी, बिबट्याच्या हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी पिंजरे व कॅमेरे लावावेत तसेच नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे. वनविभागाने केवळ सूचना न देता प्रत्यक्ष कार्यवाही करावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

**शेवटच्या पानावरून...**

**जलजीवन मिशन योजना**

नळजोडण्यांची संख्या, पाणीपुरवठ्याची सद्यस्थिती आणि संबंधित कंत्राटदारांना करण्यात आलेली देयके यांची स्वतंत्रपणे तपासणी करावी. दोष आढळल्यास संबंधित कंत्राटदार व जबाबदार अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली.

.....

**नेमबाजी**

महाराष्ट्र राज्य शिव छत्रपती पुरस्कार प्राप्त आंतरराष्ट्रीय खेळाडू व मध्य रेल्वेच्या पुण्यातील कार्यालयात कार्यरत असलेले, श्री. फुलचंद बांगर सुद्धा या स्पर्धेत स्पर्धक म्हणून सहभागी होते. स्वतःच्या वैयक्तिक कांस्य पदकासह मध्य रेल्वे संघासाठी त्यांनी सांघिक प्रकारात २ सुवर्ण अशी एकूण तीन पदके त्यांनी मिळवली आहेत. संघाचे गतविजेतेपद राखणे हे खूपच मोठे आव्हानात्मक काम होते. या संघाने रेल्वेच्या इतर झोन्स मधील संघांवर मात करत २ सुवर्ण व १ कांस्य पद जिंकून आपले विजेतेपद राखले हे खूपच कौतुकास्पद आहे. या स्पर्धेत श्री. फुलचंद बांगर यांस ३ पोजीशन ५० मीटर प्रकारात / ६००/५८१ टीम गोल्ड आणि वैयक्तिक कांस्य पदक मिळाले. प्रोन ५० मीटर प्रकारात / ६५४/६१८.९ टीम गोल्ड अशी पदक मिळाली.

.....

**धनंजय मुंडे**

कारभाराला एक शिस्त लावली, ती शिस्त आणि समृद्धी कधीही कमी होऊ देणार नाही, असा विश्वास त्यांनी पुढे बोलताना व्यक्त केला. दरम्यान परळीच्या व्यापारपेठेला चांगला ग्राहकवर्ग उपलब्ध असून, टोकवाडी - ब्रम्हवाडी येथील बाजार समितीच्या ८५ एकर जमिनीवर सुमारे ५० कोटी रुपये खर्च करून भव्य व्यापारी संकुल, शेतकरी सुविधा केंद्र, शेतकऱ्यांना विविध कार्यक्रम करण्यासाठी मोफत वापरता येईल असे मंगल भवन, असे विविधुपयोगी संकुल उभारण्यात येणार असून, व्यापारी बांधवांनी एकत्रित त्याठिकाणी आपले व्यापार स्थिर करून, अधिक व्यापक व्यवसाय वृद्धीसाठी प्रयत्न केले जातील, असेही त्यांनी सांगितले. यावेळी नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी, माजी आ. संजय दौंड यांनीही आपले मनोगत व्यक्त केले; तसेच कार्यक्रमाचे प्रास्ताविक बाजार समितीचे सभापती सूर्यभान नाना मुंडे यांनी केले. यावेळी ज्येष्ठ व्यावसायिक शांतीलाल जैन, विजय वाकेकर, संदीप लाहोटी, नंदकिशोर बियाणी, सूर्यभान नाना मुंडे, माऊली दादा फड, बाजीराव धर्माधिकारी, विष्णुपंत सोळंके, वैजनाथराव सोळंके, राजाभाऊ पोळ, सुरेश टाक, संजय जाधव, जयपाल लाहोटी, आयुब भाई पठाण, दत्ताभाऊ देशमुख, राजाभाऊ गिराम, प्रभाकर दहिफळे, भगवानराव फड, राजाभाऊ जगताप, सुग्रीव गीते, माणिक भाऊ फड, पिंटू मुंडे, माऊली मुंडे यांसह प्रतिष्ठित व्यापारी, विविध व्यवसायिक, आडते, हमाल - मापाडी, अन्य पदाधिकारी आदी उपस्थित होते.

.....

**महासभा**

आंबेडकर यांच्या मार्गदर्शनाखाली होणारी ही महासभा बुधवार दिनांक २५ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ४ वाजता मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज पार्क दादर येथे पार पडणार आहे या महासभेला महाराष्ट्रातील संविधान प्रेमी नागरिक, सामाजिक कार्यकर्ते आणि वंचित बहुजन आघाडीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा महासचिव इंजि. प्रशांत उघडे यांनी केले आहे.

.....

**गोविंद मुंडे**

होईल आणि बाजार समितीचा नावलौकिक वाढेल, यासाठी प्रयत्नशील राहणार असल्याचे त्यांनी सांगितले. जिल्हाध्यक्ष म्हणून त्यांच्यावर जिल्ह्यातील कृषी उत्पन्न बाजार समित्यांमधील कर्मचाऱ्यांना संघटनेशी जोडणे, सभासद संख्या वाढविणे, कर्मचाऱ्यांचे वेतन, भत्ते, पदोन्नती, निवृत्तीवेतन तसेच इतर प्रलंबित प्रश्नांसाठी पाठपुरावा करणे आणि नागरिकांच्या या न्याय्य मागण्यांची गंभीर दखल घेऊन तात्काळ दिलासा द्यावा, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा यावेळी युवासेनेच्या वतीने देण्यात आला.

.....

**बिबट्याची दहशत**

बिबट्या दिसल्याची घटना समोर आली होती. त्यानंतर आता घागरवाडा येथे गाईवर हल्ला झाल्याने परिसरातील गावांमध्ये बिबट्याच्या वावराबाबत भीती अधिकच वाढली आहे. वनविभागाने या घटनेची तातडीने दखल घेऊन घागरवाडा परिसरात पाहणी करावी, बिबट्याच्या हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी पिंजरे व कॅमेरे लावावेत तसेच नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे. वनविभागाने केवळ सूचना न देता प्रत्यक्ष कार्यवाही करावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

.....

**सानप महाराज**

महोत्सवाचा आदर्श घ्यावा भरत मुंडे व त्यांच्या बंधूंचा आदर्श घेऊन आपणही आपल्या मातापित्यांचा योग्य सन्मान ठेवावा अशी भावनिक साद महाराजांनी तरुणांना घातली या कीर्तन महोत्सवाचे नियोजन आणि मार्गदर्शन टोकवाडी गावचे सुपुत्र महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध कीर्तनकार श्री ह भ प तुकाराम महाराज मुंडे शास्त्री यांनी केले होते. कीर्तन साथीसाठी तालरत्न नामदेव महाराज फड उखळीकर, मनोहर गुरुजी मुंडे डाबीकर ,मुरली अण्णा डावीकर, अरविंद काळे टोकवाडीकर, कैलास मुरकुटे मुरकुटवाडीकर, इत्यादी गायक वादक यांची उपस्थिती होती ,तर प्रमुख मान्यवरांमध्ये युवा भगवान सेनेचे प्रदेशाध्यक्ष माणिकभाऊ फड, श्रीहरी मुंडे इ. मान्यवर उपस्थित होते. कीर्तन सोहळा यशस्वी करण्यासाठी श्री ह भ प जगदीश महाराज सोनवणे व श्री ह भ प गणेश महाराज गुट्टे यांनी परिश्रम घेतले. गावातील रत्नेश्वर भजनी मंडळ वास्कर भजनी मंडळ व संगीत भजनी मंडळाची उपस्थिती कीर्तनाच्या साथीसाठी होती. गावातील आणि पंचक्रोशीतील असंख्य भाविकांनी कीर्तन व महाप्रसादाचा लाभ घेतला .कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माऊली मुंडे सर यांनी केले. आभाराचे मनोगत व्यक्त करताना डॉ भरत मुंडे आपल्या आईच्या आठवणीने भाऊक झाले आणि भरत मुंडे यांचे भावपूर्ण भाषण ऐकताना संपूर्ण भाविक श्रोत्यांच्या डोळ्यांमध्ये अश्रू उभे राहिले आईच्या संघर्षाची कहाणी डॉ. भरत मुंडे एम एस सर्जन यांच्या मुखातून ऐकताना सर्व समाज गहिवरला. असे सोहळे वारंवार करता यावेत ही भावना डॉ. भरत मुंडे यांनी यावेळी बोलून दाखवली.

## जाहीर प्रगटन

**जाहीर प्रगटन देणार**

**सिद्धीकीबी महेबूब पठाण रा. कवडगांव तालुका वडवणी जिल्हा बीड**

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की मी सिद्धी किबी मेहबूब पठाण रा. कबडगाव तालुका वडवणी, जिल्हा बीड येथील रहिवासी असून माझे वडिलांकडील नाव अपसासदिकी अब्दुल्ला हे नाव आहे. या नावाने वडिलांच्या ताब्यातील शिवार मौजे कवडगाव तालुका वडवणी जिल्हा बीड येथील जमीन गट क्रमांक ४६३ मध्ये . २ हेक्टर १६ आर जमीन क्षेत्र आहे. जमिनीचे सातबाराच्या पत्रकावर अपसासदिकी अब्दुला हे नाव आहे. परंतु माझे लग्न झाल्यामुळे सदरील माझे नाव सिद्धीकिबी मेहबूब पठाण या नावाने वरील जमीन संपूर्ण क्षेत्र माझ्या नावाने करण्यात येणार आहे. यावर कोणाचा आक्षेप असल्यास सबंधिताने हे जाहीर प्रकरण प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसाच्या आत योग्य त्या पुराव्या सहित सदरील पत्यावर आपला आक्षेप नोंदवावा. मुदतीत जर कोणाचीही काही उजर व तक्रार न आल्यास जमिनीच्या सातबारा पत्रकावर आम्ही संबंधित कार्यालयात जाऊन सिद्धीकिबी महेबूब पठाण असे नाव करून घेऊ व त्यानंतर कोणाचाही कसलाही आक्षेप चालणार नाही.

सबब जाहीर प्रगटन

**स्वाक्षरीत/-**
**जाहीर प्रगटन लिहून देणारे**
**सिद्धीकीबी महेबूब पठाण**
**रा.कवडगांव ता.वडवणी जि.बीड**

## जाहीर प्रगटन

सर्व संबंधितांना या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की मी गणपत साहेबराव राऊत रा.पानमळा, नगर रोड, वाघोली, जिल्हा पुणे.

माझी मालकी व प्रत्यक्ष ताब्यातील मौजे वरपगाव , तालुका अंबाजोगाई ,जिल्हा बीड येथील शिवारातील गट क्रमांक १०७ (० हे २० आर) , १२३ (० हे०४ आर), २४७ (० हे २२ आर),२४९ (० हे १३ आर) मधील एकूण क्षेत्र ही जमीन माझ्या मालकी व ताब्याची आहे .

माझ्या सातबारा वर नजरचुकीने माझे नाव गणपती साहेबराव राऊत असे टाकण्यात आलेले आहे .तरी ते नाव गणपत साहेबराव राऊत असे करण्यात यावे असे या प्रगटनाद्वारे प्रसिद्ध केले आहे .

या नावाच्या बदलास कोणाचाही आक्षेप असेल तर अशा संबंधित व्यक्तींनी सदर जाहीर प्रगटन प्रसिद्ध केल्यापासून पंधरा दिवसांच्या आत आपली लेखी हरकत योग्य त्या कागदपत्रे व पुराव्यासह खालील पत्त्यावर सादर करावी. कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास सदर सात बारा उतारा यावरसंबंधित कार्यालयात जाऊन गणपत साहेबराव राऊत असे नाव करून घेऊ व नंतर कोणाचाही कसलाही अक्षेप चालणार नाही .

सबब जाहीर प्रगटन

**जाहीर प्रगटन देणारे**
**गणपत साहेबराव राऊत**
**रा.पानमाला नगर रोड, वाघोली, जि.पुणे**

## जाहीर प्रगटन

सर्व संबंधितांना या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की मी गणपत साहेबराव राऊत रा . पानमळा ,नगर रोड , वाघोली, जिल्हा पुणे .

माझी मालकी व प्रत्यक्ष ताब्यातील मौजे परडी, तालुका वडवणी, जिल्हा बीड ४३११४४ येथील शिवारातील गट क्रमांक ३० मधील एकूण क्षेत्र १ हेक्टर २३ आर ही जमीन माझ्या मालकी व ताब्याची आहे.

माझ्या खरेदी खत आणि सातबारा वर नजरचुकीने माझे नाव गणेश साहेबराव राऊत असे टाकण्यात आलेले आहे .तरी ते नाव गणपत साहेबराव राऊत असे करण्यात यावे असे या प्रगटनाद्वारे प्रसिद्ध केले आहे.

या नावाच्या बदलास कोणाचाही आक्षेप असेल तर अशा संबंधित व्यक्तींनी सदर जाहीर प्रगटन प्रसिद्ध केल्यापासून पंधरा दिवसांच्या आत आपली लेखी हरकत योग्य त्या कागदपत्रे व पुराव्यासह खालील पत्त्यावर सादर करावी

कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास सदर खरेदी खत आणि सातबारा यावर संबंधित कार्यालयात जाऊन गणपत साहेबराव राऊत असे नाव करून घेऊ व त्यानंतर कोणाचाही कसलाही अक्षेप चालणार नाही.

सब जाहीर प्रगटन

**जाहीर प्रगटन देणारे**
**गणपत साहेबराव राऊत**
**रा.पानमाला नगर रोड, वाघोली, जि.पुणे**

समन्स लवाद अधिकारी श्री ॲड मन्मथ विलासअप्पा लांडगे लवाद अधिकारी कार्यालय संस्था कायदा २००२ व लवाद आणि समजोता कायद्यान्वये आर्बिटेशन व कॉन्सीलेशन ॲक्ट लवाद अधिकारी यांचे कार्यालय, अरुणोदय मार्केट परळी वै.
लवाद अर्ज क्र.११७/२०२६

## नोटीस

**श्री वैद्यनाथ अर्बन मल्टीस्टेट को ऑप क्रेडिट सोसायटी लि परळी वै जि बीड**
**विरुद्ध**
**श्री चौंडे रमेश वसंतअप्पा व इतर २ (कर्जदार)**
**रा.परळी वैजनाथ, ता.परळी वैजनाथ, जि.बीड**
**१. श्री चौंडे उमेश वसंतअप्पा, परळी वै.**
**२. ईटके महादेव दत्तात्रय, परळी वै.**

अर्जदार श्री वैद्यनाथ अर्बन मल्टीस्टेट को ऑप क्रेडिट सोसायटी लि परळी वै जि बीड यांनी तुमच्या विरूद्ध लवाद अर्ज या कार्यालयात दाखल केला आहे त्यामुळे तुम्ही स्वतः अदा तुमच्या माहितीगार वकिलांमार्फत दि.२७.११.२०२६ रोजी सकाळी १०.३० ते दुपारी ०३.३० वाजेपर्यत श्री मन्मथ विलासअप्पा लांडगे अरुणोदय मार्केट परळी वै यांच्या समोर हजर राहुन लेखी म्हणणे मांडावे गैरहजर राहिल्यास आपणास कांहीएक सांगायचे नाही असे समजुन लवादाचे एकतर्फी हुकूम करण्यात येईल याची नोंद घ्यावी यापुर्वी आपणास पोस्टाने आर.पी.ए.डी पाठवलेल्या नोटीस परत आलेल्या आहेत. सबब हे जाहिर समन्स / प्रगटन आज दि.२४.११.२०२६ रोजी माझ्या सही शिक्यानिशी दिले आहे.

**लवाद अधिकारी**
**ॲड.मन्मथ विलासअप्पा लांडगे**

समन्स लवाद अधिकारी श्री ॲड मन्मथ विलासअप्पा लांडगे लवाद अधिकारी कार्यालय संस्था कायदा २००२ व लवाद आणि समजोता कायद्यान्वये आर्बिटेशन व कॉन्सीलेशन ॲक्ट लवाद अधिकारी यांचे कार्यालय, अरुणोदय मार्केट परळी वै.
लवाद अर्ज क्र.११७/२०२६

## नोटीस

**श्री वैद्यनाथ अर्बन मल्टीस्टेट को ऑप क्रेडिट सोसायटी लि परळी वै जि बीड**
**विरुद्ध**
**श्री शिंदे वैजनाथ पंडितराव व इतर २ (कर्जदार)**
**रा.परळी वैजनाथ , ता.परळी वैजनाथ, जि.बीड**
**१. श्री बळवंत विक्रम उत्तमराव, परळी वै.**
**२. श्री निर्मल दिगांबर विठ्ठलराव, परळी वै.**

अर्जदार श्री वैद्यनाथ अर्बन मल्टीस्टेट को ऑप क्रेडिट सोसायटी लि परळी वै जि बीड यांनी तुमच्या विरूद्ध लवाद अर्ज या कार्यालयात दाखल केला आहे त्यामुळे तुम्ही स्वतः अदा तुमच्या माहितीगार वकिलांमार्फत दि २७.११.२०२६ रोजी सकाळी १०.३० ते दुपारी ०३.३० वाजेपर्यत श्री मन्मथ विलासअप्पा लांडगे अरुणोदय मार्केट परळी वै यांच्या समोर हजर राहुन लेखी म्हणणे मांडावे गैरहजर राहिल्यास आपणास कांहीएक सांगायचे नाही असे समजुन लवादाचे एकतर्फी हुकूम करण्यात येईल याची नोंद घ्यावी यापुर्वी आपणास पोस्टाने आर.पी.ए.डी पाठवलेल्या नोटीस परत आलेल्या आहेत. सबब हे जाहिर समन्स / प्रगटन आज दि.२४.११.२०२६ रोजी माझ्या सही शिक्यानिशी दिले आहे.

**लवाद अधिकारी**
**ॲड.मन्मथ विलासअप्पा लांडगे**

समन्स लवाद अधिकारी श्री ॲड मन्मथ विलासअप्पा लांडगे लवाद अधिकारी कार्यालय संस्था कायदा २००२ व लवाद आणि समजोता कायद्यान्वये आर्बिटेशन व कॉन्सीलेशन ॲक्ट लवाद अधिकारी यांचे कार्यालय, अरुणोदय मार्केट परळी वै.
लवाद अर्ज क्र.१०७/२०२६

## नोटीस

**श्री वैद्यनाथ अर्बन मल्टीस्टेट को ऑप क्रेडिट सोसायटी लि परळी वै जि बीड**
**विरुद्ध**
**श्री देशमुख अमर राजेसाहेब (परळी वै.) व इतर २ (कर्जदार)**
**रा.परळी वैजनाथ , ता.परळी वैजनाथ, जि.बीड**
**१. श्री चव्हाण अनिल शेषेराव, परळी वै.**
**२. श्री देशमुख तानाजी शिवाजीराव, परळी वै.**

अर्जदार श्री वैद्यनाथ अर्बन मल्टीस्टेट को ऑप क्रेडिट सोसायटी लि परळी वै जि बीड यांनी तुमच्या विरूद्ध लवाद अर्ज या कार्यालयात दाखल केला आहे त्यामुळे तुम्ही स्वतः अदा तुमच्या माहितीगार वकिलांमार्फत दि २७.११.२०२६ रोजी सकाळी १०.३० ते दुपारी ०३.३० वाजेपर्यत श्री मन्मथ विलासअप्पा लांडगे अरुणोदय मार्केट परळी वै यांच्या समोर हजर राहुन लेखी म्हणणे मांडावे गैरहजर राहिल्यास आपणास कांहीएक सांगायचे नाही असे समजुन लवादाचे एकतर्फी हुकूम करण्यात येईल याची नोंद घ्यावी यापुर्वी आपणास पोस्टाने आर. पी. ए. डी पाठवलेल्या नोटीस परत आलेल्या आहेत. सबब हे जाहिर समन्स / प्रगटन आज दि.२४.११.२०२६ रोजी माझ्या सही शिक्यानिशी दिले आहे.

**लवाद अधिकारी**
**ॲड.मन्मथ विलासअप्पा लांडगे**

24 Nov 2026 jalna page 3_Layout 1 11/24/2026 12:04 AM Page 1

महाराष्ट्रातील आघाडीचे दैनिक

# जगमित्र

विष्णू निवृत्ती कदम
(संपादक जालना, आवृत्ती), ९४२२९९१०३२, ७३८५८९०४४४

PRGI.No.- MHMAR/25/A2848

जालना | मंगळवार दि.२४ नोव्हेंबर २०२६ | पान ३

## संविधान दिनानिमित्त जालन्यात विविध कार्यक्रमांचे आयोजन

**जालना/जिमाका**

भारतीय संविधानाचे महत्त्व आणि त्यातील लोकशाही मूल्यांची जनजागृती करण्यासाठी संविधान दिनानिमित्त गुरुवार, दि. २६ नोव्हेंबर रोजी जालना येथे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

भारतीय संविधान २६ नोव्हेंबर १९४९ रोजी स्वीकारण्यात आले असून, २६ जानेवारी १९५० पासून संविधानाची अंमलबजावणी सुरू झाली. संविधानाने देशातील नागरिकांना सामाजिक, आर्थिक व राजकीय न्याय, विचार व अभिव्यक्ती स्वातंत्र्य, समानता तसेच बंधुता यांसारखी मूलभूत मूल्ये प्रदान केली आहेत. देशाची एकता, अखंडता आणि नागरिकांच्या हक्कांचे संरक्षण करण्यात संविधानाची महत्त्वपूर्ण भूमिका आहे.

संविधान दिनानिमित्त सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण कार्यालयाच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथील सभागृहात दि. २६ नोव्हेंबर रोजी सकाळी १० वाजता संविधान दिनाचा मुख्य कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. तसेच सकाळी ८ वाजता संविधान जागरूकता रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे.

ही रॅली समता द्वार येथून सुरू होऊन निर्धारित मार्गाने नूतन वसाहत, माजी मंडई व शासकीय रुग्णालय मार्गे डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथे पोहोचणार आहे.

या कार्यक्रमास नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून संविधान दिनाच्या उपक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन समाजकल्याण सहाय्यक आयुक्त डॉ. अनिता राठोड यांनी केले आहे.

# जालना जिल्ह्यातील दुष्काळ नियोजन बैठकीत

## आ.अर्जुनराव खोतकर यांचे अधिकाऱ्यांना महत्त्वपूर्ण निर्देश!

**जालना/प्रतिनिधी**

जालना जिल्ह्यातील संभाव्य दुष्काळी परिस्थितीचा सामना करण्यासाठी तसेच नागरिक, शेतकरी आणि पशुधनाला आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने जालना जिल्हा परिषद येथे दुष्काळ नियोजन बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी शिवसेना उपनेते तथा आमदार अर्जुनराव खोतकर होते.

यावेळी आ.खोतकर यांनी जिल्ह्यातील पाणीटंचाई, जनावरांसाठी चारा, शेतकऱ्यांचे प्रश्न आणि ग्रामीण भागातील रोजगाराच्या उपलब्धतेचा सविस्तर आढावा घेतला. दुष्काळी परिस्थितीत सर्वसामान्य नागरिक, शेतकरी आणि शेतमजुरांना कोणत्याही प्रकारच्या अडचणींचा सामना करावा लागू नये, यासाठी प्रशासनाने पूर्वनियोजन करून तातडीने उपाययोजना राबवाव्यात, असे निर्देश त्यांनी दिले.

**पाणीपुरवठ्यासाठी ७२ तासांची विशेष मोहीम**

ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर होण्यापूर्वीच आवश्यक उपाययोजना करण्याचे निर्देश ग्रामीण पाणीपुरवठा विभागाला देण्यात आले. जलजीवन मिशनअंतर्गत पूर्ण झालेल्या, अपूर्ण असलेल्या तसेच केवळ कागदोपत्री पूर्ण दाखविण्यात आलेल्या योजनांचा सविस्तर अहवाल सादर करण्यास सांगण्यात आले. बंद पडलेल्या पाणीपुरवठा योजना, बोअरवेल आणि पाइपलाइन दुरुस्तीसाठी ७२ तासांची विशेष मोहीम राबवावी. प्रत्येक गावासाठी पुढील ९० दिवसांचा पाणीपुरवठा नियोजन आराखडा तयार करावा, असे निर्देश त्यांनी दिले.

टँकरद्वारे होणाऱ्या पाणीपुरवठ्यात पारदर्शकता ठेवण्यासाठी प्रत्येक फेरीची प्रणालीद्वारे नोंद करावी आणि ग्रामस्थांकडूनही त्याची पडताळणी करावी. तसेच जलसंधारणाच्या कामांची प्रत्यक्ष पाहणी करून १५ दिवसांत सविस्तर अहवाल सादर करावा, असेही त्यांनी स्पष्ट केले.

**महावितरणच्या तक्रारी २४ तासांत निकाली काढा**

वीजपुरवठ्याअभावी बंद पडलेल्या पाणीपुरवठा योजना तातडीने सुरू करण्यासाठी महावितरणने प्राधान्याने कार्यवाही करावी. ट्रान्सफॉर्मर, मोटार आणि वीजजोडणीसंदर्भातील तक्रारी सोडविण्यासाठी स्वतंत्र नोडल अधिकारी नियुक्त करून तक्रारींचा २४ तासांत निपटारा करावा, असे निर्देश देण्यात आले.

महसूल विभागाने प्रत्येक गाव, वाडी, वस्ती आणि तांड्यातील परिस्थितीची प्रत्यक्ष पाहणी करून वस्तुस्थितीदर्शक अहवाल सादर करावा. प्रत्येक गावासाठी जबाबदार समन्वय अधिकारी नियुक्त करावा. विहीर अधिग्रहण आणि टँकरसंदर्भातील प्रस्ताव प्रलंबित न ठेवता नागरिकांना पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यासाठी तातडीने कार्यवाही करावी, असे आमदार खोतकर यांनी सांगितले.

**शासकीय जमिनीवर चारा लागवडीला प्राधान्य**

पशुधनासाठी चाऱ्याची उपलब्धता सुनिश्चित करण्यासाठी ज्या शासकीय जमिनींवर पाणी उपलब्ध आहे, त्या ठिकाणी चारा पिकांची लागवड करण्याचे निर्देश कृषी विभागाला देण्यात आले. पशुसंवर्धन विभागाने गावनिहाय पशुधनाची संख्या, उपलब्ध चारा आणि संभाव्य चारा टंचाईचा आढावा घ्यावा. जनावरांच्या पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, चारा वितरण आणि पशुवैद्यकीय सुविधा यांचेही योग्य नियोजन करावे, असे त्यांनी सांगितले.



**रोजगार हमीच्या कामांना गती द्या; प्रत्येक गावात कामे सुरू करा**

दुष्काळी परिस्थितीत शेतकरी आणि शेतमजुरांच्या हाताला काम मिळणे अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे -- / अंतर्गत प्रत्येक ग्रामपंचायतीने पुढील तीन महिन्यांचा रोजगार व कामांचा आराखडा तयार करावा. जलसंधारण, पाणंद रस्ते, शोषखड्डे आणि पुनर्भरणाच्या कामांना प्राधान्य द्यावे.

प्रत्येक शिवारात किमान ५०० शोषखड्डे तयार करण्याचे उद्दिष्ट ठेवून आठ दिवसांत आराखडा सादर करावा. रोजगार हमीच्या कामांमधील मस्टर, मोजमाप पुस्तिका आणि पेमेंटसंदर्भातील विलंब टाळावा. प्रत्येक गावात रोजगाराची कामे सुरू राहतील, याची दक्षता घ्यावी, असे निर्देश त्यांनी दिले.

**पीकविमा, नुकसानभरपाई आणि अनुदानाची प्रकरणे तातडीने निकाली काढा**

शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा देण्यासाठी पीकविमा, नुकसानभरपाई, आणि विविध शासकीय अनुदानांची प्रलंबित प्रकरणे तातडीने निकाली काढावीत. कोणत्याही तांत्रिक किंवा प्रशासकीय कारणामुळे शेतकऱ्यांना शासकीय योजनांच्या लाभापासून वंचित राहावे लागू नये, यासाठी संबंधित विभागांनी विशेष लक्ष द्यावे, असे त्यांनी सांगितले.

**कागदोपत्री नियोजन नको, प्रत्यक्ष कामातून नागरिकांना दिलासा द्या!**

दुष्काळ निवारणाच्या उपाययोजना केवळ बैठकींपुरत्या किंवा कागदोपत्री मर्यादित न राहता त्यांची प्रत्यक्ष अंमलबजावणी झाली पाहिजे. प्रत्येक विभागाने आपली जबाबदारी ओळखून परस्पर समन्वयाने काम करावे. पाणीटंचाई, चारा उपलब्धता आणि रोजगाराच्या प्रश्नांवर तातडीने कार्यवाही करून नागरिकांना प्रत्यक्ष दिलासा द्यावा, असे आवाहन आमदार अर्जुनराव खोतकर यांनी केले.

या बैठकीत पाणीपुरवठा, जलसंधारण, महावितरण, महसूल, कृषी, पशुसंवर्धन आणि रोजगार हमी विभागांना स्पष्ट जबाबदाऱ्या देऊन कालबद्ध नियोजनावर भर देण्यात आला. ७२ तासांत पाणीपुरवठा योजनांच्या दुरुस्तीची मोहीम, प्रत्येक गावासाठी ९० दिवसांचा पाणी आराखडा, आठ दिवसांत रोजगार हमीचा आराखडा आणि १५ दिवसांत जलसंधारणाच्या कामांचा अहवाल सादर करण्याचे महत्त्वपूर्ण निर्देश आमदार खोतकर यांनी दिले.

**बैठकीस उपस्थित मान्यवर व अधिकारी**

यावेळी शिवसेना संपर्कप्रमुख भास्कर आंबेकर, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष अनिरुद्ध खोतकर, शिवसेना संपर्कप्रमुख पंडितदादा भुतेकर, शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे, शिवसेना शहरप्रमुख विष्णू पाचफुले, तालुकाप्रमुख यांनी भगवान अंभोरे, गणेश मोहिते, महादेव वाघ, नागेश डवले, बाळू पाचारणे, सचिन देशमुख, बाळू भिसे, साळूक राम, गिराम कमलाकर कळकुंबे, राहुल गवारे, प्रमोद वाघमारे, आप्पासाहेब उगले, काशिनाथ अण्णा जाधव, गोपाल डोंगरे, कृष्णा डोंगरे आदी उपस्थित होते. प्रशासकीय स्तरावर रामदास दौंड, तहसीलदार गवळी, नायब तहसीलदार राजू निहाळ, कार्यकारी अभियंता (पाणीपुरवठा) जंजाळ, महावितरणचे उपअभियंता सचिन उकांडे, भूजल संरक्षण अधिकारी, गटविकास अधिकारी बारगीरे, सहकार अधिकारी मंगेश जोशी यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी-कर्मचारी, सरपंच, प्रशासक तसेच आजी-माजी जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्य उपस्थित होते.

## ८ बेकायदेशीर धारदार शस्त्रे जप्त, दोघांविरुद्ध गुन्हा दाखल

**अंबड/ज्ञानेश्वर साळुंके**

अंबड : बेकायदेशीररीत्या धारदार तलवारी व विविध घातक शस्त्रे बाळगणाऱ्या दोघांविरुद्ध अंबड पोलिसांनी कारवाई करत ₹५,२००/- किमतीची एकूण ८ शस्त्रे जप्त केली आहेत. याप्रकरणी भारतीय हत्यार कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, दिनांक २२ नोव्हेंबर २०२६ रोजी दुपारी १:३० वाजेच्या सुमारास अंबड पोलीस ठाण्याचे पथक आरोपींच्या शोधासाठी कोर्ट रोडवरील दत्ताजी भाले हायस्कूलसमोर गेले होते. यावेळी आरोपींच्या घराबाहेर उत्तर दिशेच्या कोपऱ्यात ग्रीननेट लावलेल्या लिंबाच्या झाडाखाली एका लोखंडी पेटीमध्ये बेकायदेशीररीत्या शस्त्रे लपवून ठेवल्याचे निदर्शनास आले. पोलिसांनी तपासणी केली असता विनापरवाना बाळगलेली एकूण ८ धारदार हत्यारे मिळून आली.

आरोपींची नावे:

अजय ऊर्फ बबलू भुजंग पवार ऊर्फ रामचंद्र रंगनाथ गांगुर्डे

गुण्या ऊर्फ विशाल ऊर्फ विजय भुजंग पवार

(दोघे रा. कोर्ट रोड, दत्ताजी भाले हायस्कूलसमोर, अंबड, जि. जालना)

जप्त केलेला मुद्देमाल (एकूण किंमत ₹५,२००/-):

३२ इंच व २५.५ इंच लांबीच्या दोन धारदार तलवारी

२५ इंच व १८ इंच लांबीचे दोन कुकरीसारखे धारदार हत्यारे

२२ इंच लांबीची एक कट्यार

२४ इंच लांबीचा लोखंडी दांडा असलेली कुऱ्हाड आणि ६ इंच लांबीची विनादांड्याची कुऱ्हाड

१२ इंच लाकडी मूठ असलेली साखळीदार व तीक्ष्ण धार असलेली गदा

याप्रकरणी अंबड पोलीस ठाण्यात गु.र.नं. ८५९/२०२६, कलम ४/२५ भारतीय हत्यार कायदा (भा.ह.का.) अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला आहे. सदरची कारवाई पोलीस निरीक्षक संतोष घेडके यांच्या मार्गदर्शनाखाली पोउपनि बी. बी. नरोडे, पोहेकॉ दिपक चव्हाण, यशवंत मुंडे, मपोहेकॉ अलका केंद्रे, पोशि अरून मुंडे आणि तुकाराम मदन यांच्या पथकाने केली. प्रकरणाचा पुढील तपास अंबड पोलीस करत आहेत.

## रस्त्यालगत उभारलेल्या विद्युत खांबांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर

### संभाजी ब्रिगेडचे सार्वजनिक बांधकाम विभाग व महावितरणला निवेदन

**मंठा/प्रतिनिधी**



तालुक्यातील रस्त्यांच्या लगत उभारलेल्या विद्युत खांबांमुळे अपघाताचा धोका; संयुक्त तांत्रिक सर्वेक्षण, नियमबाह्य खांबांचे स्थलांतर आणि दोषींवर कारवाईची मागणीमंठा प्रतिनिधी मंठा तालुक्यात सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीतील विविध रस्त्यांच्या लगत उभारण्यात आलेल्या विद्युत खांबांमुळे वाहनधारकांसह नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर बनला असून, यासंदर्भात संभाजी ब्रिगेड मंठाच्या वतीने सार्वजनिक बांधकाम विभाग आणि महावितरणच्या संबंधित अधिकाऱ्यांना स्वतंत्रपणे अंतिम स्मरणपत्र देण्यात आले आहे.यापूर्वी संभाजी ब्रिगेडच्या वतीने रस्त्यालगत उभारण्यात आलेल्या विद्युत खांबांच्या कायदेशीर परवानग्या, मंजूर आराखडे, तांत्रिक मान्यता, रस्त्याची हद्द तसेच खांब उभारणीदरम्यान सुरक्षा नियमांचे पालन करण्यात आले आहे की नाही, याची चौकशी करण्याची मागणी करण्यात आली होती. मात्र, यापूर्वी निवेदन देऊनही संबंधित विभागांकडून ठोस चौकशी, संयुक्त तांत्रिक सर्वेक्षण किंवा प्रत्यक्ष कार्यवाही झाल्याचे दिसून येत नसल्याने आता अंतिम स्मरणपत्र देण्यात आले आहे.सार्वजनिक बांधकाम विभागाला दिलेल्या निवेदनात रस्त्यांची प्रत्यक्ष पाहणी करून महावितरणसोबत संयुक्त तांत्रिक सर्वेक्षण करण्याची, विद्युत खांब उभारणीसाठी आवश्यक परवानग्या व मंजूर आराखड्यांची पडताळणी करण्याची, रस्त्याच्या हद्दीत अथवा वाहतुकीस अडथळा निर्माण करणाऱ्या खांबांची मोजणी करून नियमबाह्य खांब सुरक्षित ठिकाणी स्थलांतरित करण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच नियमांचे उल्लंघन झाल्याचे निष्पन्न झाल्यास संबंधित एजन्सी, ठेकेदार व जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.महावितरणच्या संबंधित अधिकाऱ्यांना दिलेल्या अंतिम स्मरणपत्रात विद्युत खांब उभारणीसाठी आवश्यक प्रशासकीय व तांत्रिक मान्यता, कायदेशीर परवानग्या, संबंधित ठेकेदार व एजन्सीची माहिती आणि संपूर्ण तालुक्यातील धोकादायक खांबांचे संयुक्त सर्वेक्षण करून त्याबाबत तातडीने कार्यवाही करण्याची मागणी करण्यात आली आहे.यापूर्वी रस्त्यालगत असलेल्या विद्युत खांबाला वाहनाची धडक बसून एका शेतकऱ्याचा मृत्यू झाल्याची घटना घडलेली असताना, अशा धोकादायक परिस्थितीकडे प्रशासनाने गांभीर्याने लक्ष देणे आवश्यक आहे. भविष्यात अशा दुर्घटना घडू नयेत यासाठी केवळ कागदोपत्री चौकशी न करता प्रत्यक्ष रस्त्यांची पाहणी, अंतर मोजणी आणि धोकादायक खांबांचे स्थलांतर करणे गरजेचे असल्याचे संभाजी ब्रिगेडने स्पष्ट केले आहे.दोन्ही विभागांना दिलेल्या स्मरणपत्रात यापुढेही प्रशासनाकडून तातडीने चौकशी व कार्यवाही न झाल्यास संबंधित कार्यालयांसमोर लोकशाही मार्गाने धरणे आंदोलन करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा देण्यात आला आहे. तसेच केलेल्या चौकशी व कार्यवाहीचा लेखी अहवाल संभाजी ब्रिगेडला देण्याची मागणीही करण्यात आली आहे.रस्ते हे नागरिकांच्या सुरक्षित प्रवासासाठी असतात; मात्र रस्त्यांच्या कडेला असलेले विद्युत खांबच अपघाताचे कारण ठरत असतील, तर संबंधित यंत्रणांनी याची जबाबदारी स्वीकारून तातडीने उपाययोजना करणे आवश्यक आहे. नागरिकांच्या जीविताशी संबंधित या प्रश्नावर संभाजी ब्रिगेड आता प्रशासनाच्या कार्यवाहीकडे लक्ष ठेवणार असून, दुर्लक्ष झाल्यास आंदोलनाचा मार्ग स्वीकारणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

## दुष्काळाच्या सावटात शेतकऱ्यांना मिळणार मानसिक आधार; आर्ट ऑफ लिव्हिंग च्या माध्यमातून घडवणार युवाचार्य

**जालना/जिमाका**

दुष्काळी परिस्थितीमुळे शेतीचे आर्थिक गणित बिघडले असून शेतकरी बांधवांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. पाणीटंचाई, आर्थिक विवंचना आणि भविष्याची चिंता यामुळे शेतकऱ्यांवरील मानसिक ताण वाढत आहे. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना केवळ आर्थिक मदतीचीच नव्हे, तर मानसिक आधार, भावनिक साथ आणि जगण्याची नवी उमेद देण्याच्या मानवी दृष्टिकोनातून जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या संकल्पनेतून जिल्ह्यात एक अभिनव उपक्रम हाती घेण्यात आला आहे. आर्ट ऑफ लिव्हिंग संस्थेच्या माध्यमातून मंठा व परतूर तालुक्यातील दुष्काळग्रस्त गावांमध्ये १०० ते १५० युवा स्वयंसेवकांना विशेष प्रशिक्षण देऊन सक्षम



समुपदेशन स्वयंसेवक अर्थात काउन्सिलिंग वॉरियर्स घडविण्यात येणार आहेत.

या उपक्रमाच्या नियोजनासाठी आज पंचायत समिती, परतूर येथे बैठक संपन्न झाली. यावेळी गटविकास अधिकारी कौशल पाटील, सुप्रविण पाखरे, आर्ट ऑफ लिव्हिंगचे प्रशिक्षक सचिन लिंबोळकर, योगेश अग्रवाल, शरद डोल्हारकर, पांडुरंग तात्या शिंदे, गजानन वायाळ, मोरेश्वर बोराडे आदी उपस्थित होते. या प्रशिक्षणातून युवकांना ताणतणावमुक्त जीवन जगण्याची कला, मानसिक स्वास्थ्य, ध्यान, प्राणायाम, सकारात्मक विचार, भावनिक संतुलन आणि संवाद कौशल्य यांचे मार्गदर्शन करण्यात येणार आहे. विशेषतः संकटाच्या काळात शेतकरी बांधवांचे मनोबल वाढविणे, त्यांच्या अडचणी संवेदनशीलतेने समजून घेणे, त्यांना मानसिक आधार देणे आणि जीवनाकडे सकारात्मक दृष्टिकोनातून पाहण्याची प्रेरणा देणे, यावर भर दिला जाणार आहे.

या उपक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे प्रशिक्षित युवक केवळ समुपदेशनापुरते मर्यादित राहणार नाहीत, तर गावाच्या सामाजिक जडणघडणीतही सक्रिय भूमिका बजावतील. गावातील सामाजिक, आध्यात्मिक आणि सार्वजनिक कार्यक्रमांमध्ये सकारात्मक सहभाग घेऊन युवकांनी गावकऱ्यांना एकत्र आणावे, सामाजिक सलोखा वाढवावा आणि गावाच्या सर्वांगीण विकासासाठी सामूहिक पुढाकार घ्यावा, अशी मानसिकता या प्रशिक्षणातून विकसित केली जाणार आहे.

# खाजगी बँकांच्या शेतकरी खातेदारांनाही कर्जमाफी व नवीन पीककर्जाचा लाभ द्यावा; अखिल भारतीय ग्राहक पंचायतीचे प्रशासनाला निवेदन

## मागणी मान्य न झाल्यास ७ डिसेंबरपासून उपोषणाचा इशारा

**अंबड/ज्ञानेश्वर साळुंके**

राष्ट्रीयीकृत बँकांप्रमाणेच आयडीबीआय, एचडीएफसी, आयसीआयसीआय आणि ॲक्सिस यांसारख्या खाजगी बँकांमधील पात्र शेतकरी खातेदारांनाही कर्जमाफीचा तातडीने लाभ देऊन रब्बी हंगामासाठी नव्याने पीककर्ज उपलब्ध करून द्यावे, या मागणीसाठी सोमवारी (दि. २३ नोव्हेंबर २०२६) अखिल भारतीय ग्राहक पंचायत आणि शेतकरी खातेदारांच्या वतीने प्रशासनाला निवेदन देण्यात आले. अखिल भारतीय ग्राहक पंचायतीचे जालना जिल्हाध्यक्ष तथा जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेचे अशासकीय सदस्य डॉ. रमेश गणपतराव तारगे यांच्या नेतृत्वाखाली हे निवेदन उपविभागीय अधिकारी श्री. उमाकांतजी पारधी (राज्याचे मुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री यांच्या नावे) आणि दुय्यम निबंधक, अंबड श्री. संतोष भोईटे यांच्या समक्ष प्रत्यक्ष उपस्थितीत सादर करण्यात आले.

**निवेदनातील प्रमुख मुद्दे व मागण्या:**

खाजगी बँकांबाबत होणारा भेदभाव थांबवावा: राज्य शासनाने जाहीर केलेल्या कर्जमाफीची अंमलबजावणी राष्ट्रीयीकृत बँकांमार्फत सुरू झाली असली तरी खाजगी बँकांमधील खातेदार शेतकऱ्यांबाबत अद्याप ठोस कार्यवाही झालेली नाही. बँकेच्या प्रकारानुसार भेदभाव न करता सर्व पात्र शेतकऱ्यांना समान न्याय मिळावा. दुष्काळी परिस्थिती आणि रब्बी हंगामाची गरज: जालना



जिल्ह्यातील अंबड व घनसावंगी तालुक्यांत यावर्षी अत्यल्प पावसामुळे खरीप पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. आता रब्बी पेरणीसाठी बियाणे, खते व मशागतीकरिता शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक भांडवलाची गरज असून कर्जमाफी प्रलंबित राहिल्यास रब्बी हंगाम हातातून जाण्याची भीती आहे. पीककर्ज नाकारू नये: कर्जमाफीची प्रक्रिया प्रलंबित असल्याच्या कारणावरून कोणत्याही शेतकऱ्याला नवीन पीककर्ज नाकारले जाऊ नये, असे स्पष्ट निर्देश शासनाने खाजगी बँकांना द्यावेत व कालबद्ध कार्यक्रम राबवून शेतकऱ्यांची माहिती मागवावी.

**७ डिसेंबर रोजी उपोषणाचा इशारा:**

रब्बी हंगामाची वेळ निघून गेल्यानंतर कर्जमाफीचा लाभ मिळून शेतकऱ्यांना व्यावहारिक फायदा होणार नाही. त्यामुळे शासनाने आणि प्रशासनाने या प्रश्नाची तातडीने दखल घेऊन प्रत्यक्ष कार्यवाही करावी; अन्यथा येत्या ७ डिसेंबर २०२६ रोजी न्याय हक्क मागण्यासाठी कार्यालयासमोर उपोषण करण्यात येईल, असा इशारा डॉ. रमेश तारगे व शेतकऱ्यांनी निवेदनाद्वारे दिला आहे.

**उपस्थित खातेदार व शेतकरी:**

या निवेदनावर आयडीबीआय बँकेच्या खातेदारांसह अनेक शेतकऱ्यांच्या स्वाक्षऱ्या असून निवेदन सादर करतेवेळी हरिभाऊ संतराम कदम, भागवत जनकराव ढवळे, सुरेश पांडुरंग भापकर, मीनाबाई जनकराव ढवळे, आकर्षण रमेश तारगे, छाया रमेश तारगे, सखाराम आसाराम शिंगाडे, रमेश भानुदास काटकर, भानुदास शिंगाडे, बन्सी परमेश्वर, विठ्ठल चांगदेव कदम, बालाजी रमेश काटकर, प्रल्हाद आबासाहेब दहिभाते, भागवत अशोकराव उढाण, रामेश्वर आसाराम खरात, एकनाथ उत्तम गरड, दशरथ सखाराम शेळके, अमोल बाबासाहेब मोताळे, राजेश गोरखनाथ उके आणि ईश्वर परमेश्वर येऊल आदी शेतकरी खातेदार उपस्थित होते. दरम्यान माननीय मुख्यमंत्री कार्यालयाकडे निवेदन मेल केले असता तात्काळ पुढील कार्यवाही साठी पणन व सहकार विभागाला पाठवले आहे.

दैनिक जगमित्र आवृत्ती कार्यालय मंमादेवी शॉपिंग सेंटर दु. नं.१ रेल्वे स्टेशन रोड मस्तगड जुना जालना मो. ९४२२९९१०३२, ७३८५८९०४४४

महाराष्ट्रातील निर्भिड दैनिक
# जगमित्र
संतोष सोनवणे (लातूर जिल्हा प्रतिनिधी)
मो.9673158719
PRGI.No.- MHMAR/26/A2511
लातूर जिल्हा आवृत्ती — मंगळवार दि.२४ नोव्हेंबर २०२६ — पान नं. ४

## विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील ओपीडी गुरुनानक जयंतीनिमित्त राहणार बंद

लातूर, दि. २३: गुरुनानक यांच्या जयंतीनिमित्त मंगळवार, २४ नोव्हेंबर, २०२६ रोजी शासकीय सुट्टी असल्यामुळे विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील बाह्यरुग्ण विभाग बंद राहील. तसेच बुधवार, २५ नोव्हेंबर, २०२६ पासून बाह्यरुग्ण विभाग (ओपीडी) नियमित वेळेप्रमाणे सुरु राहील. तसेच रुग्णालयाची आपत्कालीन सेवा २४ तास सुरु राहील, असे लातूर विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे वैद्यकीय अधिक्षक डॉ. सचिन गरुड यांनी कळविले आहे.
महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर ( VDGMC Latur)




(MH-Nursing-CET-2026) व NEET PG २०२६-२७ प्रवेशासंबंधी सूचना प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत. तसेच MUHS हिवाळी २०२६ पहिल्या टप्प्यातील परीक्षा २८ नोव्हेंबर २०२६ पासून सुरू होत आहेत

# भादा शिवारामध्ये राष्ट्रीय बाल स्वास्थ्य अंतर्गत ऊसतोड कामगार व मुलांची केली आरोग्य तपासणी..

**औसा/प्रतिनिधी**

औसा तालुक्यातील भादा शिवारामध्ये राष्ट्रीय बाल स्वास्थ्य अंतर्गत ऊसतोड कामगार आणि त्यांच्या उपस्थित मुलांची केली आरोग्य तपासणी सोमवार दिनांक २३ नोव्हेंबर २०२६ रोजी शेत शिवारात जावून करण्यात आली..ऊसतोड कामगारांच्या वस्त्यांतील ० ते १८ वर्षे वयोगटातील बालकांची राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम (RBSK) अंतर्गत विशेष आरोग्य तपासणी व गर्भवती महिलांचे प्रसुतीपूर्व तपासणी (ANC) सर्वेक्षण राबविण्याबाबत. आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांचे पत्र सध्या राज्यातील विविध भागांमध्ये ऊस गाळप हंगाम सुरु



झाला असून, मोठ्या संख्येने ऊसतोड कामगार आपल्या कुटुंबीयांसह साखर कारखान्यांच्या परिसरात तसेच शेतशिवारात तात्पुरत्या पालांमध्ये वास्तव्यास आहेत. या कामगारांसोबत गर्भवती महिला व त्यांची लहान मुलेही स्थलांतरित होऊन राहत असल्याने त्यांच्या आरोग्याची नियमित तपासणी तसेच आवश्यक आरोग्यसेवा मिळण्यामध्ये अनेक अडचणी निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे जिल्ह्यातील सर्व संबंधित वस्त्यांची नोंद घेऊन ० ते १८ वर्षे वयोगटातील प्रत्येक बालकाची RBSK पथकामार्फत आरोग्य तपासणी करावी व आवश्यकतेनुसार उपचार/संदर्भसेवा सुनिश्चित करावी. याच भेटीदरम्यान वस्तीतील गर्भवती महिलांचे स्वतंत्र ANC सर्वेक्षण करण्यात यावे असे आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांचे संदर्भिय पत्रान्वये सुचित करण्यात आले असून या मोहिमेच्या अंमलबजावणीसाठी जिल्हास्तरीय नियोजन व संनियंत्रण -जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी मोहिमेचे एकूण संनियंत्रण करतील. जिल्हा प्रजनन व बाल आरोग्य अधिकारी (DRCHO) हे जिल्हास्तरीय नोडल अधिकारी राहतील. DRCHO यांनी साखर कारखाने, स्थानिक प्रशासन, पथके व प्राथमिक आरोग्य केंद्रे (PHC) यांच्याशी समन्वय साधून पुढील बाबी सुनिश्चित कराव्यात :वस्तीनिहाय सूक्ष्म नियोजन RBSKपथकांच्या भेटींचे वेळापत्रक तपासणीची गुणवत्ता व संदर्भसेवेचा पाठपुरावा मोहिमेच्या प्रगतीचा साप्ताहिक आढावा घेण्यात याव्या अशा सूचना देण्यात आल्या आहेत. त्या सूचनेप्रमाणे भादा प्राथमिक आरोग्य केंद्र अंतर्गत येणाऱ्या भादा शिवारांमध्ये..डॉ. एम्बडवार वर्षा वैद्यकीय अधिकारी ,यांच्या मार्गदर्शनाखाली तपासणी करून शासनाच्या धोरणाची माहिती सांगण्यात आली यावेळी मनोज चव्हाण औषध निर्माण अधिकारी,श्रीमती सुमन केंद्रे परिचारिका, श्रीमती शिंदे प्रमिला परिचारिका ,रवी लिपारे आरोग्य कर्मचारी भादा आदी उपस्थित होते.

# श्रद्धेचा अखंड जागर! चापोलीतून १३० किमीचा पायी प्रवास करीत मन्मथ ज्योत कपिलधारकडे मार्गस्थ.

### भक्तीचा तेजोमय वारसा! चापोलीतून मन्मथ ज्योतीची ३२ वर्षांची अखंड परंपर

**चापोली/प्रतिनिधी**

मन्मथ स्वामींच्या भक्तिमय जयघोषाने आणि उत्साहपूर्ण वातावरणात चापोली येथून मन्मथ ज्योत कपिलधारकडे मार्गस्थ झाली. दरवर्षीप्रमाणे यंदाही दि.२३ सोमवारी सायंकाळी ५ वाजता रामगीर महाराज संजीवन मठ संस्थान येथून मन्मथ ज्योतीचे प्रस्थान झाले.मन्मथ स्वामींच्या संजीवन समाधीस्थळ असलेल्या कपिलधार (जि. बीड) येथे ही ज्योत नेण्यात येत आहे. मन्मथ ज्योतीचे हे ३२ वे वर्ष असून, चापोली ते कपिलधार असे सुमारे १३० किलोमीटरचे अंतर भाविक पायी प्रवास करून अवघ्या १७ तासांत पार करणार आहेत.कार्तिक शुद्ध त्रिपुरारी पौर्णिमेच्या पावन पर्वावर कपिलधार येथे दि.२४ मंगळवारी सकाळी १० वाजता



मन्मथ ज्योत पोहोचणार आहे. या ज्योतीच्या माध्यमातून मन्मथ स्वामींच्या विचारांचा, भक्तीचा आणि आध्यात्मिक परंपरेचा जागर केला जातो.वर्षानुवर्षे अखंड सुरू असलेल्या या परंपरेमुळे चापोली आणि परिसरातील भाविकांमध्ये विशेष उत्साहाचे वातावरण आहे. यावेळी डॉ.धनंजय चाटे, पं.स.सदस्य गजानन होनराव, मनसे पर्ववर कपिलधार येथे दि.२४ मंगळवारी सकाळी १० वाजता मन्मथ ज्योत पोहोचणार आहे. या ज्योतीच्या माध्यमातून मन्मथ स्वामींच्या विचारांचा, भक्तीचा आणि आध्यात्मिक परंपरेचा जागर केला जातो.वतालुकाध्यक्ष सुरेश शेवाळे, तंटामुक्ती उपाध्यक्ष रामेश्वर गादगे, नागेश होनराव,बालाजी कोरे, लल्ला होनराव,संगमेश्वर पाटील, विरभद्र काळगे गंगाप्रसाद मद्रेवार,धोंडीराम होनराव,दत्ता आलमले,कुमार आबंदे,संग्राम कोरे,गोरख गुळवे,राजू गुडपल्ले,ऋषिकेश ताकबिडे , प्रदीप आबंदे,मनोज पाटील, बसवेश्वर स्वामी यांच्यासह अनेक भाविक उपस्थित होते.

# शेतकऱ्याची मागणी आणि आमदारांचा खंबीर प्रशासकीय पाठपुरावा;

### वीज वितरण कंपनीचा कारभार आता मुरुड ऐवजी सोयीच्या औसा येथून...

**औसा/प्रतिनिधी**

:भादा ग्रामस्थांसाठी आनंदाची आणि महत्त्वाची माहिती... वीज वितरण कंपनीचा कारभार आता मुरुड ऐवजी सर्वांच्या सोयीच्या ठिकाणाहून म्हणजे औसा येथून सुरू करण्यासाठी प्रशासकीय स्तरावरून मंजुरी देण्यात आली आहे..भादा गावाच्या प्रशासकीय व्यवस्थेत हा झालेला बदल महत्त्वपूर्ण ठरला असून अनेक दिवसांपासून भादा ग्रामस्थांची मागणी होती की, भादा गावाचा वीज वितरण विभागाचा कारभार मुरुड उपविभागा ऐवजी औसा उपविभागाशी जोडण्यात यावा. ग्रामस्थांच्या या सततच्या आणि आवश्यक असलेल्या मागणीमुळे अनेक वेळा पाठपुरावा करण्यात आला होता.अखेर ग्रामस्थांच्या या मागणीला प्रशासकीय स्तरांवर यश




आले आहे!लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघाचे आमदार रमेश कराड यांनी या संदर्भात विशेष लक्ष वेधून संबंधित स्तरावर योग्य वेळी पाठपुरावा केल्यामुळे भादा वीज वितरण कार्यालयाचा समावेश पुन्हा औसा उपविभागात करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे.महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या दिनांक २२ ऑक्टोबर २०२६ रोजीच्या आदेशानुसार भादा शाखा कार्यालय औसा उपविभागाशी जोडण्यास मंजुरी देण्यात आली आहे.या निर्णयामुळे भादा ग्रामस्थांना वीज वितरणाशी संबंधित तक्रारी, कामे आणि प्रशासकीय बाबींसाठी औसा उपविभागाशी संपर्क साधणे सहज आणि सुलभ रीत्या शक्य होणार आहे.यामुळे या कार्याची दखल घेत नागरिकांकडून विशेष आभार व्यक्त केले जात आहेत.भादा ग्रामस्थांच्या अनेक दिवसांच्या मागणीला सकारात्मक प्रतिसाद देत या विषयात विशेष लक्ष दिल्याबद्दल लातूर ग्रामीणचे आमदार रमेश कराड यांचे भादा ग्रामस्थांच्या वतीने सध्या सर्वच स्तरातून मनः पूर्वक आभार व धन्यवाद व्यक्त केले जात आहेत.तर हा निर्णय म्हणजे ग्रामस्थांच्या मागणीला मिळालेला सकारात्मक प्रतिसाद आणि सातत्यपूर्ण पाठपुराव्याचे योग्य फलित आहे. अशा प्रतिक्रिया समाज माध्यमावर व्यक्त केल्या जात आहेत...

# जिल्हा बँकेच्या माध्यमातून शेतकऱ्यांसह गरजू तरुणांना न्याय देण्याचे काम करणार

### मुरुड ग्रामपंचायतीच्या सत्कार समारंभात ऋषिकेश कराड यांचे प्रतिपादन

लातूर दि. २३ :- केंद्र आणि राज्य शासनाच्या माध्यमातून मुरुड शहराच्या विकासाला गती देण्यासाठी विविध विकास कामासाठी आ. रमेशआप्पा कराड यांनी मोठ्या प्रमाणात निधी मंजूर करून दिला असून लातूर जिल्हा बँकेच्या माध्यमातून शेतकऱ्यांसह गरजू तरुणांना न्याय देण्याचे काम करणार असल्याची ग्वाही बँकेचे नूतन संचालक ऋषिकेशदादा रमेशआप्पा कराड यांनी मुरुड येथे बोलताना दिली. लातूर तालुक्यातील मौजे मुरुड ग्रामपंचायतीच्या वतीने जिल्हा बँकेचे नूतन संचालक ऋषिकेशदादा कराड यांचा सत्कार आणि संजय गांधी निराधार योजनेतील पात्र मुरुड शहरातील दीडशे लाभार्थ्यांना मंजुरी पत्राचे वाटप सोमवारी करण्यात आले. याप्रसंगी सरपंच अमृताताई अमर नाडे, उपसरपंच वैभव सापसोड, संगायो समिती अध्यक्ष बन्सी भिसे भाजपाचे मंडल अध्यक्ष सुरज शिंदे, प्रताप पाटील, महेश कणसे, बाबा भिसे, रुपेश काळे,



किशोर घुट्टे, लता भोसले, श्रुती सवयी, पल्लवी घोडके, प्रशांत शिंदे, विश्वास कावळे, अशोक सावंत, लहूराजे सव्वाशे, रवी माकोडे, राजेंद्र नाडे, बालाजी पठाडे यांच्यासह अनेकांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी बोलताना ऋषिकेशदादा कराड म्हणाले की, मुरुड येथे अप्पर तहसील कार्यालय, पाणीपुरवठा योजना, उपजिल्हा रुग्णालय भटक्या विमुक्त समाजाची स्मशानभूमी यासह विविध विकास कामांना आ. रमेशआप्पा कराड साहेब यांच्या माध्यमातून मंजुरी मिळाला. नगर परिषद मंजुरीच्या अंतिम टप्प्यात असून मुरुडच्या सर्वांगीण विकासासाठी त्याचे सातत्याने प्रयत्न असल्याचे बोलून दाखविले.भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या नेतृत्वातील मुरुड ग्रामपंचायतीने गेल्या चाळीस वर्षात जे जमले नाही ते चार वर्षात करून दाखवले असल्याचे सांगून ऋषिकेश कराड म्हणाले की, आपल्या सर्वांच्या आशीर्वादाने आणि सहकार्याने जिल्हा बँकेत संचालक म्हणून काम करण्याची मला संधी मिळाली. येणाऱ्या काळात शेतकऱ्यांसह गरजू तरुणांना उद्योग व्यवसायासाठी न्याय देण्याचे काम करणार असल्याचे सांगून मुरुड येथील जिल्हा बँकेची शाखा गावाबाहेर घेऊन जाण्याच्या हालचाली सुरू आहेत शेतकऱ्यांसह जनतेचे हित लक्षात घेऊन मुरुडकरांना गाव भागात जिथे पाहिजे तिथेच शाखा होईल असे बोलून दाखवले. उपसरपंच वैभव सापसोड यांनी मुरुड ग्रामपंचायतीच्या माध्यमातून होत असलेल्या विविध विकास कामाची माहिती दिली. महेश कणसे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. प्रारंभी जिल्हा बँकेच्या संचालकपदी निवड झाल्याबद्दल मुरुड ग्रामपंचायतीच्या वतीने ऋषिकेशदादा कराड यांचा यथोचित सत्कार करून अभिनंदन करण्यात आले. या कार्यक्रमास मुरुड शहरासह परिसरातील नागरिक कार्यकर्ते संगायो योजनेचे लाभार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कन्यादान योजनेअंतर्गत सामूहिक विवाह सोहळ्यांच

### नवविवाहित दाम्पत्यांना २५ हजार रुपयांचे अर्थसहाय्य

प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन

लातूर, दि. २३: सामूहिक विवाह सोहळ्यामध्ये सहभागी होऊन विवाह करणाऱ्या विमुक्त जाती व भटक्या जमाती (विजाभज), इतर मागासवर्ग (इमाव) आणि विशेष मागास प्रवर्गातील (विमाप्र) नवविवाहित दाम्पत्यांसाठी शासनाच्या वतीने कन्यादान योजना राबविण्यात येते. या योजनेसाठी लातूर जिल्ह्यातील धर्मादाय आयुक्तांकडे नोंदणीकृत असलेल्या स्वयंसेवी संस्थांनी किमान १० दाम्पत्यांचे (२० वधू-वर) परिपूर्ण प्रस्ताव तीन प्रतींमध्ये लातूर येथील इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सहायक संचालक यांच्या कार्यालयात सादर करावेत, असे आवाहन सहायक संचालक अभय अटकळ यांनी केले आहे.२ फेब्रुवारी २०१९ च्या शासन निर्णयानुसार ही योजना राबवली जात असून, १८ जुलै २०२४ च्या सुधारित शासन निर्णयान्वये या योजनेअंतर्गत लाभार्थी नवविवाहित दाम्पत्याच्या बँक खात्यात थेट २५ हजार रुपये अनुदान जमा केले जाते, तसेच हा सोहळा आयोजित करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांनाही शासनाकडून प्रति जोडपे ४ हजार रुपये प्रोत्साहनात्मक अनुदान दिले जाते. त्याअनुषंगाने, लातूर जिल्ह्यातील धर्मादाय आयुक्तांकडे नोंदणीकृत असलेल्या स्वयंसेवी संस्थांनी किमान १० दाम्पत्यांचे (२० वधू-वर) परिपूर्ण प्रस्ताव तीन प्रतींमध्ये लातूर येथील इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सहायक संचालक यांच्या कार्यालयात सादर करावेत. या योजनेबाबत अधिक माहितीसाठी इच्छुक स्वयंसेवी संस्थांनी लातूर येथील इतर मागास बहुजन कल्याण सहायक संचालक कार्यालयाशी संपर्क साधावा, असे कळविण्यात आले आहे.

# लातूर येथे संविधान दिनानिमित्त २६ नोव्हेंबर रोजी विविध उपक्रमांचे आयोजन

### संविधान रॅली आणि भारतीय संविधान प्रस्ताविकेचे होणार वाचन

**लातूर/प्रतिनिधी** दि. २३ : भारतीय संविधानाची ओळख सर्वांना व्हावी, यासाठी राज्यात दरवर्षी २६ नोव्हेंबर हा दिवस संविधान दिन म्हणून साजरा करण्यात येतो. संविधान दिनानिमित्त यंदा २६ नोव्हेंबर रोजी सकाळी १० वाजता लातूर येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथे संविधान प्रस्ताविकेचे वाचन करण्यात येईल. त्यानंतर शहरातून शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची संविधान रॅली काढण्यात येणार आहे. या रॅलीचा मार्ग भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन ते गूळ मार्केट, महात्मा गांधी चौक मार्गे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क असा राहील. या संविधान रॅलीचे उद्घाटन लातूरचे जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांच्या हस्ते होणार आहे. याप्रसंगी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुलकुमार मीना, जिल्हा पोलीस अधीक्षक अमोल तांबे, आणि लातूर शहर महानगरपालिकेचे आयुक्त राहुल कुलकर्णी यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. तरी या रॅलीस सर्व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन लातूर समाज कल्याण विभागाचे सहायक आयुक्त यादव गायकवाड यांनी केले आहे.

# रामेगाव लातूरमध्ये २५ डिसेंबरला नववी अखिल भारतीय बौद्ध धम्म परिषद आयोजन

बौद्ध धम्माचा लातूर पॅटर्न निर्माण करण्यासाठी बौद्ध धम्म संस्कार केंद्र उभारण्यास कटिबद्ध! - भिक्खू पय्यानंद थेरोबौद्ध धम्म संस्कार प्रशिक्षण चॅरिटेबल ट्रस्ट व सर्व बौद्ध उपासक उपाशीका यांच्या सौजन्याने प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी दिनांक २५ डिसेंबर २०२६ रोजी महाविहार धम्म संस्कार केंद्र सातकर्णी नगर बार्शी रोड रामेगाव तालुका जिल्हा लातूर येथे पू. भिक्खु डॉ उपगुप्त महाथेरो यांच्या मार्गदर्शनाखाली नववी अखिल भारतीय बौद्ध धम्म परिषदेच्या आयोजन करण्यात आल्याची माहिती धम्म परिषदेचे संयोजक भिक्खु पय्यानंद थेरो यांनी पत्रकार परिषदेमध्ये प्रेस नोट द्वारे दिली आहे. तथागत भगवान बुद्धाची शिकवण शील सदाचार करुणा मैत्री शांती बंधुत्व नीतिमत्ता व विज्ञानवाद यावर आधारलेली आहे. बुद्धाचा मानवतेचा विचार संपूर्ण जगासाठी व मानवी समूह-ासाठी अतिशय कल्याणदायी आहे. बुद्धाच्या विचाराचे प्रसारण जनमानसात होणे आवश्यक आहे. असे प्रतिपादन भिक्खू पय्यानंद थेरो यांनी या वेळी केले परिषदेच्या आयोजनासंदर्भात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. ही परिषद पू. भिक्खू डॉ. उपगुप्त महा-थेरो यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न होणार आहे. महाराष्ट्रातील ज्येष्ठ भिक्खू धम्मसेवक महाथेरो (मुळावा) परिषदेच्या अध्यक्षस्थानी राहणार असून, पूज्य भिक्खू विनयरक्खित महाथेरो (नागपूर)



यांच्या हस्ते परिषदेचे उद्घाटन होणार आहे.परिषदेत पू. भिक्खू सुमनवण्णो महाथेरो (चंद्रपूर) यांच्या हस्ते सातकर्णी स्मरणिकेचे विमोचन करण्यात येणार आहे. महाराष्ट्रासह विविध भागांतील विद्वान भिक्खू, भिक्खुणी, या परिषदेला उपस्थित राहून धम्मविषयक मार्गदर्शन करणार आहेत.परिषदेच्या पहिल्या सत्राची सुरुवात सकाळी ठीक ८ वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, लातूर येथे पंचरंगी धम्मध्वजारोहणाने होणार आहेकर्णी स्मरणिकेचे विमोचन करण्यात येणार आ. त्यानंतर धार्मिक देखावे, बुद्धमूर्ती, भिक्खू संघ, उपासक आणि उपासिका यांच्या सहभागातून भव्य धम्म मिरवणूक काढण्यात येणार आहे.

# दयानंद शिक्षण संस्था आणि लातूर ब्रह्माकुमारी सेंटरच्या संयुक्त विद्यमाने दयानंद सभागृहामध्ये सकारात्मक ऊर्जेचा जागर; 'डिस्कव्हर द न्यू यू' शिबिराचा समारोप

लातूर : दयानंद शिक्षण संस्था आणि ब्रह्माकुमारी सेंटर, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात आलेल्या आध्यात्मिक व व्यक्तिमत्त्व विकासाच्या उपक्रमांनी संपूर्ण लातूरमध्ये सकारात्मकता आणि चैतन्याचा नवा प्रवाह निर्माण केला आहे. या संपूर्ण उपक्रमांतर्गत प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाच्या सुप्रसिद्ध वक्त्या ब्रह्माकुमारी शिवानी दीदी यांच्या 'रिचार्ज युवर लाईफ' या भव्य मुख्य प्रवचन सोहळ्यानंतर, बार्शी रोडवरील दयानंद सभागृहात १९ ते २२ नोव्हेंबर २०२६ दरम्यान



'डिस्कव्हर द न्यू यू' या चार दिवसीय मार्गदर्शन मालिकेचे आयोजन करण्यात आले. या शिबिराचा समारोप रविवारी (२२ नोव्हेंबर) दुपंतर्मनातील प्रकाशात 'मी'पणातून बाहेर पडून 'वसुधैव कुटुंबकम'ची भावना प्रत्येकात रुजायला हवी आणि दररोज ध्यान व आत्मचिंतनातून मनाची पॉवरबँक रिचार्ज करणे काळाची गरज आहे. शिवानी दीदी यांच्या मार्गदर्शनामुळे आणि त्यानंतरच्या चार दिवसांच्या सत्रांमुळे संपूर्ण शहरात सकारात्मक लहरी निर्माण झाल्या असून, वातावरणात एक वेगळीच सकारात्मक ऊर्जा जाणवत आहे. 'अपना को जानो और जीवन को सफल बनाओ...' या संकल्पनेवर आधारित 'डिस्कव्हर द न्यू यू' मालिकेमध्ये आंतरराष्ट्रीय प्रेरणादायी वक्त्या बी. के. सरिता दीदी यांनी दररोज सकाळी ७.०० ते ८.३० आणि सायंकाळी ६.०० ते ७.३० अशा दोन बॅचेसमध्ये उपस्थितांना मोलाचे मार्गदर्शन केले. पहिल्या दिवशी, गुरुवारी (१९ नोव्हेंबर २०२६) 'आंतरिक शक्तियों को पहचानें' या विषयावर मार्गदर्शन करताना स्वतःतील सुप्त क्षमता व सक्षम देण्यात आला. दुसऱ्या दिवशी, शुक्रवारी (२० नोव्हेंबर २०२६) 'सर्वोच्च शक्तियों से संबंध कैसे जोड़ें' या सत्रात दैनंदिन जीवनात मानसिक संतुलन आणि आत्मबळासाठी परमात्म शक्तीशी नाते जोडण्याचे महत्त्व विशद करण्यात आले. तिसऱ्या दिवशी,

महाराष्ट्रातील निर्भिड दैनिक

# जगभित्र

मकसूद पटेल (जिल्हा प्रतिनिधी) शेख मौला शेख उस्मान (उपसंपादक नांदेड जिल्हा आवृत्ती)

मो.9767785855, 9422797473 मो.9766664949 PRGI.No.- MHMAR/26/A0270

नांदेड जिल्हा आवृत्ती — मंगळवार दि.२४ नोव्हेंबर २०२६ — पान नं. ५

## रमेश कांबळे यांचे दु:खद निधन



**लोहा/प्रतिनिधी**

सिद्धार्थ नगर लोहा येथील रहिवाशी रमेश ज्ञानोबा कांबळे यांचे दीर्घ आजाराने आज दि.२३ नोव्हेंबर रोजी पहाटे नांदेड येथील खाजगी रुग्णालयात दु:खद निधन झाले , रमेश कांबळे हे सर्व गुण संपन्न अष्टपैलू सामाजिक दायित्व जपणारे नेतृत्व होते, त्यांनी सिद्धार्थ नगरच्या सर्वांगीण विकासासाठी व अनेक नव तरुणांना पोलीस सेवेत संधी देण्यासाठी त्यांचे मोलाचे योगदान होते, रमेश कांबळे हे हिंगोली राज्य राखीव पोलीस बल ते नांदेड पोलीस मुख्यालय येथे नूतन पोलीस प्रशिक्षणार्थी ग्राउंड यांना प्रशिक्षण देत होते, अनेक नवीन नव तरुणांना पोलीस दलात अत्यंत शिस्तबद्ध प्रशिक्षण त्यांनी दिले होते , त्यांच्या हातून अनेक नवतरुण आज पोलीस सेवेत अनेक ठिकाणी नोकरी करत आहेत, त्यांच्या पश्चात त्यांची पत्नी, एक मुलगा, तीन मुली ,आई वडील, जावई , व तीन भाऊ हिंगोली राज्य राखीव पोलीस बल जालना येथे कार्यरत असलेले पोलीस उपनिरीक्षक रजनीकांत कांबळे, यवतमाळ येथे पोलीस हेड कॉन्स्टेबल असलेले अर्जुन कांबळे, सामाजिक कार्यकर्ते बबन कांबळे, जावई नाशिक येथे पोलीस उपनिरीक्षक असलेले श्याम सोनटक्के,भाऊ,पुतणे, पुतणी, बहिणी, मावशी असा मोठा कौटुंबिक परिवार आहे ,त्यांच्या पार्थिवावर आज सोमवार दिनांक २३ नोव्हेंबर सोमवार रोजी त्यांच्या पार्थिवावर शासकीय ईतमात बंदुकीच्या तीन फेरी झाडून शासकीय मानवंदना देण्यात आली, सिद्धार्थ नगर मित्र मंडळाचे अध्यक्ष अशोक सोनकांबळे सह सर्व समाज बांधव व सिद्धार्थ नगर मित्रपरिवार उपस्थित होता, यावेळी कै. रमेश कांबळे यांना अनेकांनी अश्रू पूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

# अस्वच्छतेमुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात

## कंधार तालुक्यातील गावामधील तुंबलेल्या नालीकडे ग्रा.प.चे दुर्लक्ष!

**नांदेड/माणिक भिसे**

कंधार तालुक्यातील सर्वात मोठ्या ग्रामपंचायत असलेल्या अनेक गावांमधील अनेक प्रभागांमध्ये नाले तुंबल्याने अस्वच्छतेची समस्या गंभीर बनली आहे. नाल्यांमध्ये साचलेला कचरा, गाळ आणि सांडपाण्यामुळे परिसरात दुर्गंधी पसरत असून नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. मात्र, या समस्येकडे ग्रामपंचायतच्या स्वच्छता विभागाचे दुर्लक्ष होत असल्याने स्वच्छता कर्मचाऱ्यांची नसल्याने कामकाजावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

तालुक्यातील गावामध्ये अनेक भागांतील नाल्यांमध्ये प्लास्टिकच्या पिशव्या, घरगुती कचरा, माती आणि गाळ साचल्याने सांडपाण्याचा प्रवाह थांबला आहे. परिणामी, काही ठिकाणी सांडपाणी नाल्यांबाहेर येऊन रस्त्यावर साचत आहे. त्यामुळे परिसरात दुर्गंधी पसरून नागरिकांना ये-जा करताना अडचणींचा सामना करावा लागत आहे. नाल्यांची नियमित साफसफाई होत नसल्याने ही समस्या दिवसेंदिवस वाढत असल्याचे चित्र आहे. तुंबलेल्या नाल्यांमुळे डासांची उत्पत्ती वाढण्याची शक्यता असून मलेरिया, डेंग्यू यांसारख्या आजारांचा धोका निर्माण झाला आहे. विशेषतः लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि आजारी व्यक्तींच्या आरोग्याच्या दृष्टीने ही परिस्थिती चिंताजनक आहे. गावाला स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी ग्रामपंचायतची असताना नागरिकांना अशा समस्यांना सामोरे जावे लागत असल्याने स्वच्छता विभागाच्या कार्यक्षमतेबाबत नाराजी व्यक्त होत आहे.

***नालीमधील सांडपाणी रस्त्यावर...प्रशासक नेमणुकीमुळे कामे खोळंबली***



**स्वच्छता कर्मचारी नसल्याने कामकाजावर प्रश्नचिन्ह**

नालेसफाई ही केवळ पावसाळ्यापुरती मर्यादित न ठेवता वर्षभर नियमितपणे होणे आवश्यक आहे. प्रत्येक प्रभागातील नाल्यांची पाहणी करून त्यातील गाळ व कचरा काढणे, सांडपाण्याचा प्रवाह सुरळीत ठेवणे आणि कर्मचाऱ्यांच्या कामावर नियंत्रण ठेवणे गरजेचे आहे. मात्र, प्रत्यक्षात स्वच्छतेबाबत उदासीनता दिसून येत असल्याने नागरिकांकडून नाराजी व्यक्त होत आहे. ग्रामपंचायतच्या आधिकाऱ्यांनी या समस्येकडे गांभीर्याने लक्ष देऊन तुंबलेल्या नाल्यांचे सर्वेक्षण करावे. संबंधित कर्मचाऱ्यांची जबाबदारी निश्चित करून नियमित स्वच्छता मोहीम राबवावी. स्वच्छता निरीक्षकांनी प्रत्यक्ष पाहणी करून कामकाजाचा आढावा घ्यावा. अनेक गावातील नागरिकांना स्वच्छ आणि आरोग्यदायी वातावरण मिळावे, यासाठी तातडीने कार्यवाही करावी, अशी मागणी नागरिकांतून होत आहे. तालुक्यातील बहुतांश ग्रामपंचायत मध्ये अनेक वर्षांपासून सफाईदार कर्मचारी यांची भरती नाही.

प्रशासन यासाठी परवानगी नसते का ? सफाईदार कर्मचारी यांची पगार करण्यासाठी ग्रामपंचायत कडे निधी नसते अशा वल्गना करून गावांचा खेळखंडोबा झाला आहे. वरिष्ठ अधिकारी यांनी ग्राऊंडवर उभे राहून पहाणी करावी अशी मागणी नागरिक करीत आहेत. सध्या ग्रामपंचायत मध्ये प्रशासक नेमणुकीमुळे कामे खोळंबली आहेत. वेळेवर कोणीच भेटत नसल्याने नागरिकांना हेलपाटे मारावे लागत आहेत. यावर वरिष्ठ अधिकारी यांचे लक्ष नसल्याने अनेक प्रशासकीय अधिकारी मनमानी कारभार करताना दिसतात.

## शिवा च्या राज्यव्यापी मेळाव्यास नांदेड जिल्ह्यातून हजारोंच्या संख्येने भाविक जाणार-संभाजी पाटील

**कुंडलवाडी/मोहम्मद अफजल**

शिवा अखिल भारतीय वीरशैव युवक संघटनेच्या वतीने प्रतिवर्षी कार्तिक शुद्ध पौर्णिमेच्या निमित्त श्री क्षेत्र कपिलधार तालुक्यातील जिल्हा बीड येथे होणाऱ्या यात्रेमध्ये शासकीय महापूजा व भव्य राज्यव्यापी वार्षिक मेळावा आयोजित केला जातो. दरवर्षी प्रमाणे यंदाही जिल्ह्यातून हजारोंच्या संख्येने भाविक उपस्थित राहणार आहेत, अशी माहिती जिल्हा अध्यक्ष संभाजी पाटील लोहगावकर यांनी केले आहे.

सन १९९६ पासून राज्यव्यपी मेळावा आणि सन २००२ पासून श्रीक्षेत्र कपिलधार येथील संत शिरोमणी मन्मथ स्वामी यांच्या संजीवन समाधीची शासकीय महापूजा बीडचे पालकमंत्री ,जिल्हाधिकारी ,धर्मगुरू व शिवा संघटनेचे पदाधिकारी यांच्या हस्ते दुपारी चार वाजता करण्याची परंपरा आहे मागील २५ वर्षापासून शासकीय महापूजा तर मागील ३१ वर्षापासून शिवा संघटनेचा राज्यव्यापी वार्षिक मेळावा आयोजित केला जातो त्यामुळे यंदाही दिनांक २४ नोव्हेंबर २०२६ मंगळवार रोजी दुपारी ठीक चार वाजता २५ वी शासकीय महापूजा आणि शिवा संघटनेचा ३१ वा राज्यव्यापी वार्षिक मेळावा आयोजित केला आहे .याच बरोबर शिवा संघटनेचा भव्य मेळावा होणार आहे त्यासाठी पालकमंत्री तथा उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार मा.ना. पंकजाताई मुंडे सहकार मंत्री मा,ना. बाळासाहेब



पाटील माजी मंत्री धनंजय भाऊ मुंडे माजी मंत्री जयदत्त अण्णा क्षीरसागर मा जी मंत्री मा सुरेश अण्णा नवले आ. संदीप भैय्या क्षीरसागर यांच्यासह अनेक शिवाचार्य शिवा संघटनेचे राष्ट्रीय राज्य पदाधिकारी व मान्यवर उपस्थित राहणार आहेत या राज्यव्यापी वार्षिक मेळाव्याचे अध्यक्ष व उद्घाटक म्हणून शिवा संघटनेचे संस्थापक तथा राष्ट्रीय अध्यक्ष प्रा. मनोहर धोंडे सर हे राहणार आहेत. ता.जी. बीड येथे प्रतिवर्षी कार्तिक शुद्ध पौर्णिमेनिमित्त होणाऱ्या यात्रेत कार्तिक शुद्ध पौर्णिमेच्या दिवशी दुपारी ठीक ४:०० वाजता महाराष्ट्र सह देशभरातील शिवा संघटनेचे पदाधिकारी कार्यकर्ते वीरशैव लिंगायत समाज बांधव आणि बहुजन समाज बांधवांनी ढोल ताशाच्या गजरात जय शिवा जय घोषात हजारोंच्या संख्येने श्री क्षेत्र कपिलधार येथे दुपारी ३:०० वाजेपर्यंत उपस्थित राहावे असे आवाहन शिवा संघटना जिल्हाध्यक्ष संभाजी पाटील लोहगावकर यांनी केले आहे.

## आ.बोढारकर यांच्या आमदार निधीतून शहरप्रमुख सुहास पाटील खराणे यांच्या पुढाकारातून ५ कोटी रुपयांचा मुलभूत सुविधामधील विकास कामांचा शुभारंभ..

**नांदेड/प्रतिनिधी**

नवीन नांदेड - नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीतील शिवसेनेचे नांदेड दक्षिण सिडको शहरप्रमुख सुहास पाटील खराणे यांच्या पुढाकारातून वसरणी प्रभागातील शंकरनगर भागातील विविध परिसरातील व जयप्रकाश नगर असरजन, धुमाळ वाडी नांदेड दक्षिण आमदार आनंदराव पाटील बोढारकर यांच्या मुलभूत सुविधा अंतर्गत पाच कोटी रुपयांचा विकासनिधी सिमेंट काँक्रीटच्या रस्ते व नाली बांधकाम साठी निधी उपलब्ध करून दिला असून या कामांचा शुभारंभ आ.आनंद पाटील बोढारकर यांच्या हस्ते करण्यात २३ नोव्हेंबर रोजी करण्यात आला.

नावा मनपाच्या प्रभाग क्रमांक १९ मधील वसरणी भागातील शंकरनगर भागातील हनुमान मंदिर,गुरूखुध्दे ते इंदर गुलदानी,संजय नांदेडकर ते बामणवार ,संतोष घोडके ते यशोदीप कसबे ते सुदर्शन घोडके ते देविदास मंडले, सुरेश किराणा ते



पप्पु कोमटवार ,सतिश कुलकर्णी ते सतिश पोदार,नारायण बडे ते रवि खंगले सुरेश वाकडे रस्त्यासाठी वसरणी येथे तर धुमाळ वाडी, जयप्रकाश नगर असरजन येथे सिमेंट काँक्रीटच्या रस्त्यासाठी पाच कोटी रुपयांच्या विकास निधी अंतर्गत कामाच्या शुभारंभ २३ नोव्हेंबर रोजी सकाळी १० वाजता आ.आनंदराव पाटील बोढारकर,शिवसेनेचे नांदेड दक्षिण जिल्हा प्रमुख विनय पाटील गिरडे, शिवसेनेचे नांदेड दक्षिण युवासेना जिल्हा प्रमुख बाळु पाटील तिडके, नांदेड दक्षिण शहरप्रमुख तुलजेश यादव, सिडको शहरप्रमुख सुहास पाटील खराणे, नगरसेविका सौ.दिपाली संतोष मोरे, सौ.अनुराधा राजु पाटील काळे,श्रीमती सुलोचना धोडीबाराव काकडे,माजी नगरसेवक संजय मोरे,गणेश काकडे,विनोद काकडे, गजानन शास्त्री,आनंदा कुंडदे, मारोती धुमाळ , नंदु पाटील वैध,बाला राज माकलु, मोबीन,भिम यादव,यांच्या सह प्रभागातील जेष्ठ नागरिक, महिला,युवक यांच्या उपस्थितीत करण्यात आला, यावेळी मनपा कनिष्ठअभियंता ठाणेदार यांच्या सह गुत्तेदार तेजुसिंग ग्रंथी उपस्थित होते.

सदरील सिमेंट काँक्रीटच्या रस्ते व नाली बांधकाम होणाऱ्या रस्त्यामुळे गेल्या अनेक वर्षांपासून परिसरातील नागरीकांच्या मोठ्या प्रमाणात सोय होणार आहे, कार्यक्रम यशस्वीतेसाठी परिसरातील कार्यकर्ते सचिन खराणे, ज्ञानेश्वर खराणे, प्रमोद खराणे,शुभम सुर्यवंशी, ज्ञानेश्वर चंद्रकांत खराणे,सह परिसरातील नागरिक यांनी परिश्रम घेतले.

## ब्राह्मण समाजातील बेरोजगार युवक-युवतींसाठी स्वयंरोजगाराची संधी; परशुराम महामंडळाची राज्यभर अर्ज स्वीकृती शिबिरे आयोजित

### २५ नोव्हेंबरपासून सहा विभागीय मुख्यालयांवर आयोजन; १५ लाखांपर्यंत व्याज परतावाचा लाभ

**नांदेड/प्रतिनिधी**

ब्राह्मण समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल आणि सुशिक्षित बेरोजगार युवक-युवतींना स्वयंरोजगाराच्या माध्यमातून उद्योजकतेची संधी उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या परशुराम आर्थिक विकास महामंडळाने पुढाकार घेतला आहे. महामंडळाच्या विविध कर्ज व्याज परतावा योजनांची माहिती देण्यासाठी तसेच पात्र लाभार्थ्यांचे अर्ज प्रत्यक्ष स्वीकारण्यासाठी राज्यातील सहा विभागीय मुख्यालयांच्या ठिकाणी एक दिवसीय अर्ज स्वीकृती शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. २५ नोव्हेंबरपासून या शिबिरांना सुरुवात होणार आहे अशी माहिती अखिल भारतीय ब्राह्मण महासंघाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष निखिलभाऊ लातूरकर यांनी दिली आहे.

या शिबिरांचे आयोजन सकाळी ११ वाजता करण्यात आले आहे. २५ नोव्हेंबर रोजी नागपूर, २६ नोव्हेंबर रोजी अमरावती, २८ नोव्हेंबर रोजी छत्रपती संभाजीनगर, ३० नोव्हेंबर रोजी नाशिक, २ डिसेंबर रोजी पुणे आणि ४ डिसेंबर रोजी रत्नागिरी येथे जिल्हा नियोजन समिती सभागृहात ही शिबिरे होणार आहेत. मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर येथील शिबिराला समाज बांधवांनी व इच्छुक तरुणांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन निखिलभाऊ लातूरकर यांनी केले आहे.



महामंडळामार्फत वैयक्तिक कर्ज व्याज परतावा आणि गट कर्ज व्याज परतावा अशा दोन प्रमुख योजना राबविण्यात येतात. वैयक्तिक कर्ज योजनेअंतर्गत बँकेकडून घेतलेल्या पाच, दहा आणि पंधरा लाख रुपयांच्या कर्जावर अनुक्रमे दीड लाख, तीन लाख आणि साडेचार लाख रुपयांपर्यंत व्याज परतावा मिळू शकतो. नियमित हप्ते भरल्यास कमाल सात वर्षांपर्यंत १२ टक्के किंवा बँकेने आकारलेला व्याजदर यापैकी कमी दराने व्याज परतावा दिला जातो.

गट कर्ज व्याज परतावा योजनेत दोन किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तींना एकत्रितपणे ५० लाख रुपयांपर्यंत कर्ज घेण्याची सुविधा आहे. पाच किंवा त्यापेक्षा अधिक सदस्यांच्या गटासाठी १५ लाख रुपयांपर्यंत व्याज परतावाची तरतूद आहे.

या योजनांसाठी अर्जदार महाराष्ट्राचा रहिवासी आणि ब्राह्मण समाजातील असणे आवश्यक आहे. वयोमर्यादा १८ ते ४५ वर्षे असून, कौटुंबिक वार्षिक उत्पन्न आठ लाख रुपयांच्या आत असावे. महिलांसाठी ३० टक्के, तर दिव्यांगांसाठी तीन टक्के जागा राखीव ठेवण्यात आल्या आहेत.

शिबिरात अर्ज सादर करण्यापूर्वी महामंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावर पूर्वनोंदणी करणे आवश्यक आहे. अधिकाधिक पात्र युवक-युवतींनी या संधीचा लाभ घेऊन स्वयंरोजगारातून आर्थिक स्वावलंबन साधावे, असे आवाहन परशुराम आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष कॅप्टन आशिष दामले, अखिल भारतीय ब्राह्मण महासंघाचे प्रदेशाध्यक्ष निखिलभाऊ लातूरकर यांनी केले आहे.

अधिक माहितीसाठी रिॅा.ारहीरीह-ीिर.सेॅं.ळप या संकेतस्थळाला भेट द्यावी किंवा ०२०-२९९८२१२५ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन अखिल भारतीय ब्राह्मण महासंघाचे प्रदेश उपाध्यक्ष विजय शेकदार (भ्रमणध्वनी ९७६७२५४३६३) यांनी केले आहे.

## कार्तिकी एकादशी यात्रेसाठी पिंपरी चिंचवड महापालिकेचा सहकार्याचा हात!

**पिंपरी-चिंचवड/प्रतिनिधी**

आगामी कार्तिकी एकादशीच्या पार्श्वभूमीवर श्रीक्षेत्र आळंदी येथे दाखल होणाऱ्या लाखो वारकरी भाविकांना आवश्यक सोयी-सुविधा उपलब्ध व्हाव्यात, यासाठी पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने आवश्यक ते सहकार्य करण्यात येणार आहे. यासंदर्भात आज आळंदी नगरपरिषदेच्या शिष्टमंडळाने महापालिका मुख्यालयात महापौर रवि लांडगे यांची भेट घेतली.यावेळी कार्तिकी एकादशी यात्रा कालावधीत वारकरी भाविकांची गैरसोय होऊ नये, यासाठी स्वच्छता, आरोग्यसेवा, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था तसेच अन्य आवश्यक नागरी सुविधांच्या नियोजनाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.वारकरी संप्रदायाची समृद्ध परंपरा जपणे आणि श्रीक्षेत्र आळंदी येथे येणाऱ्या भाविकांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देणे ही सामूहिक जबाबदारी आहे. या भावनेतून आळंदी नगरपरिषद व पिंपरी-चिंचवड महानगरपालिका प्रशासनाने परस्पर समन्वयातून काम करावे, अशी भूमिका महापौर रवि लांडगे यांनी व्यक्त केली.कार्तिकी यात्रेच्या अनुषंगाने आवश्यक मनुष्यबळ, स्वच्छता व्यवस्था, आरोग्यविषयक उपाययोजना व इतर सुविधांसाठी महापालिकेच्या संबंधित विभागांमार्फत



सहकार्य उपलब्ध करून देण्याबाबतही यावेळी सकारात्मक चर्चा झाली.या बैठकीस आळंदी नगरपरिषदेचे नगराध्यक्ष प्रशांतभाऊ कुऱ्हाडे, उपनगराध्यक्षा सुजाताताई तापकीर, यात्रा समितीच्या सभापती पूजाताई घुंडरे, आळंदी देवस्थानचे प्रमुख विश्वस्त पुरुषोत्तम महाराज पाटील, मा. भावार्थ देखणे, विश्वस्त मा. कबीरबुवा लोंढे, तसेच पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम व विक्रांत बगाडे उपस्थित होते.''श्रीक्षेत्र आळंदी ही महाराष्ट्राच्या आध्यात्मिक आणि सांस्कृतिक परंपरेची पवित्र भूमी आहे. कार्तिकी एकादशीसाठी येणाऱ्या वारकरी भाविकांची सेवा करण्याची संधी मिळणे, हे आमच्यासाठी भाग्याचे आहे. यात्रेच्या यशस्वी नियोजनासाठी पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आवश्यक ते सर्व सहकार्य करेल.'' रवि लांडगेमहापौर, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका

## कु.दाफिया शकिल शेख हिची एम.बी.बी.एस. शिक्षणासाठी निवड, शाळेचा वतीने सत्कार

**कुंडलवाडी/प्रतिनिधी**

कुंडलवाडी शहरातील नामांकित के. रामलू पब्लिक स्कूल ही शाळा नेहमीच विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी आणि उज्ज्वल भविष्यासाठी प्रयत्नशील असते. या शाळेच्या यशाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला असून, शाळेची माजी विद्यार्थिनी कु. दाफिया शकिल शेख हिची हैद्राबाद येथे एम.बी.बी.एस वैद्यकीय अभ्यासक्रमासाठी निवड झाली आहे.दाफिया हिने मिळविलेल्या या यशामुळे के. रामलू पब्लिक स्कूलच्या



शैक्षणिक गुणवत्तेचा आणि विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या मार्गदर्शनाचा पुन्हा एकदा गौरव झाला आहे. तिच्या या यशामुळे शाळेच्या शिक्षकवृंदासह परिसरातून तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.या यशाबद्दल शाळेचे संस्थापक अध्यक्ष सायरेड्डी ठक्कूरवार,सचिव यशवंत संगमवार, संचालिका रमा ठक्कूरवार, वसंत मदिकुंटावार आणि सायलु ईरलावार यांनी दाफिया व तिच्या पालकांचा पुष्पहार घालून सत्कार केला. तसेच तिच्या पुढील वैद्यकीय शिक्षणासाठी शुभेच्छा देत उज्ज्वल भविष्यासाठी सदिच्छा व्यक्त केल्या.या यशाबद्दल शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनीही दाफिया हिचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## अजितदादांचे पिंपरी-चिंचवडच्या विकासाचे स्वप्न पूर्ण करणार; शहराच्या प्रत्येक प्रश्नासाठी खंबीरपणे पाठीशी-उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार

**पिंपरी/बद्रीनारायण घुगे**

पुणे, दि. २३: पिंपरी चिंचवड शहराच्या विकासासाठी आदरणीय अजितदादांनी दिलेला वेळ, घेतलेले कष्ट आणि दाखवलेली निष्ठा यांची जाणीव प्रत्येकाला आहे. या शहराला सुंदर, नियोजनबद्ध आणि विकसित शहर बनवण्याचे स्वप्न त्यांनी पाहिले होते. शहर घडवताना त्यांनी अनेक माणसेही घडवली. पिंपरी-चिंचवडच्या विकासासाठी शासन कटिबद्ध आहे. शहराच्या प्रत्येक अडचणी सोडवण्यासाठी खंबीरपणे पाठीशी असून शहरातील सुरू असलेली सर्व विकासकामे दर्जेदार आणि निर्धारित वेळेत पूर्ण करावीत, अशा सूचना उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी दिल्या.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये श्रीमती पवार यांनी विविध विकास कामांचा आढावा घेतला त्यावेळी त्या बोलत होत्या. यावेळी महापौर रवि लांडगे, उपमहापौर श्रीम.शर्मिला बाबर, आयुक्त डॉ. विजय सुर्यवंशी, उपमुख्यमंत्री कार्यालयाचे डॉ. राजेश देशमुख, स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे, प्रशांत शितोळे आदी उपस्थित होते. उपमुख्यमंत्री श्रीमती पवार म्हणाल्या, दुष्काळी परिस्थिती, वाढती लोकसंख्या आणि बदलत्या नागरी गरजांमुळे अनेक आव्हाने निर्माण होत आहेत. अजितदादांच्या विकासाच्या दृष्टीने मोठ्या अपेक्षा होत्या. सर्वांनी शहराच्या विकासासाठी विशेष लक्ष द्यावे, ही त्यांची इच्छा होती.



शहराच्या विकासासाठी आवश्यक असणाऱ्या प्रत्येक बाबीसाठी ते नेहमी निधी उपलब्ध करून देत असत. आज देशात पिंपरी-चिंचवड शहराचा उल्लेख झाला की अजितदादांची आठवण आल्याशिवाय राहत नाही. मोशी येथील कचरा दुर्घटना अत्यंत वेदनादायी होती. भविष्यात अशा घटना पुन्हा घडू नयेत, यासाठी प्रशासनाने विशेष खबरदारी घेणे आवश्यक आहे. मोशी येथील दुर्घटनेनंतर त्या ठिकाणी कचरा नेणे थांबवण्यात आले. त्यानंतर शहरातून निर्माण होणाऱ्या कचऱ्याची विल्हेवाट संदर्भात माहिती घेतली. कचरा व्यवस्थापनाच्या प्रश्नाकडे अधिक गांभीर्याने लक्ष द्यावे. मोशी येथे उभारण्यात येत असलेल्या कचरा प्रक्रिया प्रकल्पाची प्रत्यक्ष पाहणी केली जाईल. या प्रकल्पाचे काम सध्या कोणत्या टप्प्यावर आहे, याची माहिती घेऊन प्रकल्पाचे काम प्रलंबित न ठेवता ते तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना प्रशासनाला दिल्या आहेत.

24 Nov 2026_Layout 1 11/23/2026 11:19 PM Page 2



# तब्बल १८०० कोटींची जलजीवन मिशन योजना कागदावरच!

## २६८ गावे, २५९ वाड्यांतील ६ लाख ३२ हजार नागरिकांची तहान टँकरवर; निधी खर्च होऊनही पाणीटंचाई कायम

**बीड/प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यात जलजीवन मिशन योजनेवर तब्बल १८०० कोटी रुपये खर्च झाल्याचा दावा असतानाही ग्रामीण भागातील पाणीटंचाई कायम असल्याचे चित्र आहे. जिल्ह्यातील २६८ गावे आणि २५९ वाड्यांमधील सुमारे ६ लाख ३२ हजार नागरिकांना ४२१ टँकरद्वारे पाणीपुरवठा करावा लागत आहे. त्यामुळे जलजीवन मिशनची कामे प्रत्यक्षात पूर्ण झाली आहेत का, निधीचा विनियोग योग्य पद्धतीने झाला आहे का, असे प्रश्न उपस्थित करत संबंधित कामांची सखोल चौकशी करून दोषी कंत्राटदार आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, या मागणीसाठी सोमवारी (दि.२३) जिल्हाधिकारी कार्यालयासमोर मटका फोडो लक्ष्यवेधी आंदोलन करण्यात आले.

सामाजिक कार्यकर्ते तथा बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ, महाराष्ट्र राज्याचे मुख्य

**जलजीवन मिशनच्या कामांची सखोल चौकशी करून दोषी कंत्राटदार व अधिकाऱ्यांवर कारवाई करा; जिल्हाधिकारी कार्यालयासमोर मटका फोडो आंदोलन–डॉ.गणेश ढवळे**

प्रचारप्रमुख डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनात जिल्हा प्रशासनाच्या विरोधात घोषणाबाजी करण्यात आली. जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, पालकमंत्री सुनेत्रा पवार आणि पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांना निवेदन देण्यात आले.




**जलजीवन मिशनचा उद्देश आणि प्रत्यक्ष परिस्थिती**

केंद्र सरकारच्या जलशक्ती मंत्रालयाने १५ ऑगस्ट २०१९ रोजी जलजीवन मिशन सुरू केले. ग्रामीण भागातील प्रत्येक कुटुंबाला वैयक्तिक नळजोडणीद्वारे दररोज प्रतिव्यक्ती ५५ लिटर शुद्ध व सुरक्षित पिण्याचे पाणी उपलब्ध करून देणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे.

मात्र, बीड जिल्ह्यात या योजनेवर मोठ्या प्रमाणात निधी खर्च झाल्याचे सांगितले जात असताना शेकडो गावांमध्ये नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी टँकरवर अवलंबून राहावे लागत आहे. त्यामुळे अनेक गावांतील जलजीवन मिशनची कामे केवळ कागदोपत्रीच पूर्ण दाखविण्यात आली आहेत का, कामांचा दर्जा आणि प्रत्यक्ष अंमलबजावणी तपासली आहे का, याची चौकशी करण्याची मागणी आंदोलकांनी केली. योजनेअंतर्गत मंजूर कामे, प्रत्यक्ष खर्च, पूर्णत्वाची प्रमाणपत्रे, **(पान २ वर)**

## बीडच्या सुपुत्राचे नेमबाजी स्पर्धेत यश!




**बीड/प्रतिनिधी**

५९ वी अखिल भारतीय आंतररेल्वे नेमबाजी स्पर्धा नुकतीच १६ ते २० नोव्हेंबर २०२६ या कालावधीत पश्चिम बंगाल राज्यातील आसनसोल येथील शूटींग रेंज वर पार पडली.

या आंतररेल्वे स्पर्धेत रेल्वेच्या सर्व १६ झोन्स मधील नेमबाजी संघ सहभागी होतात. मध्य रेल्वे चा नेमबाजी संघ हा माजी गतविजेता म्हणून या स्पर्धेत सहभागी झालेला होता. त्यांनी संपूर्ण स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करत आपले विजेतेपद राखले. मध्य रेल्वेकडून खेळणाऱ्या संघात अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय खेळाडू सहभागी होते. बीड जिह्यातील, पाटोदा तालुक्यातील, वाघीरा गावाचे सुपुत्र असलेले, **(पान २ वर)**

## शहर तहानलेले, मात्र विकासकामांचा धडाका!

### तीन कोटींच्या कामांचे आमदार प्रकाश सोळंके यांच्या हस्ते उद्घाटन; १२ ते १५ दिवस पाणीपुरवठा होत नसल्याने नागरिकांत नाराजी

**धारूर/अतूल शिनगारे**

धारूर शहरात एकीकडे कोट्यवधी रुपयांच्या विकासकामांचा धडाका सुरू असताना दुसरीकडे नागरिकांना मात्र पिण्याच्या पाण्यासाठी वणवण करावी लागत आहे. शहरात १२ ते १५ दिवसांपर्यंत नळाला पाणी येत नसल्याने नागरिकांचे पाण्याचे नियोजन कोलमडले आहे. शहराच्या विकासासाठी निधी उपलब्ध होत असला, तरी नागरिकांच्या मूलभूत गरजांकडे दुर्लक्ष होत असल्याची भावना व्यक्त होत आहे.

शहरांतर्गत विविध विकासकामांसाठी मंजूर झालेल्या सुमारे तीन कोटी रुपयांच्या कामांचे उद्घाटन रविवारी (ता. २२) आमदार प्रकाश सोळंके यांच्या हस्ते करण्यात आले. शहरातील रस्ते व इतर पायाभूत सुविधांच्या विकासासाठी निधी उपलब्ध होत असून विविध कामांना गती मिळत आहे. मात्र, दुसरीकडे पिण्याच्या पाण्याचा प्रश्न अद्यापही कायम असल्याने विकासाच्या प्राधान्यक्रमाबाबत नागरिकांकडून प्रश्न उपस्थित केले जात आहेत.धारूर शहराला आजवर पाच पाणीपुरवठा योजना झाल्या आहेत. असे असतानाही नागरिकांना नियमित पाणी मिळत




नसल्याचे वास्तव आहे. सध्या दुष्काळी परिस्थितीमुळे जलस्रोतांवर ताण वाढत असून पाण्याची उपलब्धताही कमी होत आहे. परिणामी, अनेक कुटुंबांना पिण्याच्या पाण्यासाठी पर्यायी व्यवस्था करावी लागत आहे. पाच योजना झाल्यानंतरही धारूरकरांची तहान भागत नसेल, तर या योजनांचा उपयोग नेमका कोणासाठी, असा सवाल उपस्थित होत आहे.

शहरात रस्ते, नाल्या आणि इतर विकासकामे होणे आवश्यक आहेच; मात्र पिण्याचे पाणी ही नागरिकांची प्राथमिक गरज **(पान २ वर)**

## शेवटच्या श्वासापर्यंत परळीकरांची सेवा करायची आणि विकासकाम म्हणून काही शिल्लक राहिले नाही पाहिजे, हाच माझा ध्यास-धनंजय मुंडे

### परळीत व्यापारी स्नेहमिलन कार्यक्रमात धनंजय मुंडेंचे दुष्काळग्रस्तांना मदतीचे आवाहन

**परळी वैद्यनाथ/प्रतिनिधी**

परळी मतदारसंघात नवनवीन रस्ते, सोलर सह शेकडो कोटी रुपयांचे नवीन विद्युत प्रकल्प, यांसारखी विविध कामे आपण मागील काही दिवसांत मंजूर करून आणली आहेत. परळी मतदारसंघात विकासकाम करायला काही शिल्लक नाही राहिले पाहिजे, असे माझे ध्येय असून शेवटच्या श्वासापर्यंत परळीकरांची सेवा करायची हाच माझा ध्यास असल्याचे मत माजी मंत्री आ. धनंजय मुंडे यांनी व्यक्त केले आहे.

परळी वैद्यनाथ कृषी उत्पन्न बाजार समितीच्या वतीने परळी येथील व्यापारी, व्यावसायिक, आडते, खरेदीदार, हमाल – मापाडी यांच्यासमवेत धनंजय




मुंडे यांच्या उपस्थितीत प्रतिवर्षाप्रमाणे दीपावली स्नेहमिलन आयोजित करण्यात आले होते, या कार्यक्रमात श्री. मुंडे बोलत होते. यावर्षी भीषण दुष्काळी परिस्थिती असून शेतकरी – कष्टकरी वर्ग संकटात सापडला आहे. त्याचा परिणाम व्यापार पेठेवर होत आहेच, मात्र तरीही गरजू शेतकऱ्यांना आपापल्या परीने मदत करण्याचे आवाहन त्यांनी यावेळी पुढे बोलताना केले.

परळी वैद्यनाथ कृषी उत्पन्न बाजार समितीकडे ७०० कोटींपेक्षा अधिक जमीन संपत्ती आहे. माझे वडील स्व. पंडित अण्णा मुंडे यांच्या कार्यकाळात या जमिनी खरेदि केल्या होत्या. स्व.अण्णांनी बाजार समिती समृद्ध करण्याबरोबरच **(पान २ वर)**

## नगरसेवक चषक सन बॉल क्रिकेट स्पर्धा उत्साहात संपन्न!



**बीड/प्रतिनिधी**

आयोजक आमेर ईनामदार यांच्या वतीने नगरसेवक चषक सन बॉल क्रिकेट स्पर्धेचे भव्य आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये बी.एम.सी.सी. आणि अल कुरैश क्रिकेट क्लब या दोन संघांमध्ये अंतिम सामना रंगला.

आज झालेल्या अटीतटीच्या अंतिम सामन्यात बी.एम.सी.सी. संघाने विजय मिळवत नगरसेवक चषकावर आपले नाव कोरले. या अंतिम सामन्याला प्रमुख अतिथी म्हणून बीडचे माजी आमदार सय्यद सलीम साहेब, राष्ट्रवादी काँग्रेसचे गटनेते नगरसेवक खुर्शीद आलम, सरफराज सोनू शेख, उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेचे बीड उपजिल्हाप्रमुख अशफाक भाई शेख, पाशा सेठ, इम्रान खान, एम.डी. आवेज यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. यावेळी उप-स्थित प्रमुख अतिथींचा आयोजकांच्या वतीने सत्कार करण्यात आला. या क्रिकेट स्पर्धेमुळे खेळाडूंना आपले कौशल्य दाखवण्याची संधी मिळाली. स्पर्धेला क्रिकेटप्रेमींचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. विजेत्या बी.एम.सी.सी. संघाचे हार्दिक अभिनंदन! तसेच सहभागी अल कुरैश क्रिकेट क्लब संघाचेही विशेष कौतुक!

## अँड.प्रकाश आंबेडकरांच्या उपस्थितीत संविधान सन्मान महासभा

**धारूर/अतूल शिनगारे**



महात्मा फुले, राजश्री शाहू महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा वारसा पुढे घेऊन जाण्यासाठी तसेच भारतीय संविधानाचे संरक्षण आणि लोकशाही मूल्य अबाधित ठेवण्यासाठी वंचित बहुजन आघाडीच्या वतीने दरव-र्षीप्रमाणे यावर्षीही २५ नोव्हेंबर रोजी संविधान सन्मान महासभेचे आयोजन करण्यात आले असून पदाधिकारी कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा महासचिव इंजि. प्रशांत उघडे यांनी केले आहे.

देशातील संविधानिक स्वयस्त संस्थांच्या अधिकारावर होत असलेला आघात मताधिकारावर निर्माण झालेले प्रश्न आणि संविधानांच्या मूल्यांचे होत असलेली पायमल्ली या विरोधात जनजागृती करण्यासाठी या महासभेचे आयोजन करण्यात येत आहे.

भारतीय संविधान हे देशाच्या कारभाराचा आधार असला पाहिजे मनुवादी विचारसरणी नव्हे हा ठाम संदेश देशभर पोहचविणण्यचा निर्धार या महासभेच्या माध्यमातून व्यक्त केला जाणार आहे. वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष बाळासाहेब **(पान २ वर)**

## कर्मचारी संघटनेची मोठी जबाबदारी परळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सहाय्यक सचिव गोविंद मुंडे यांच्या खांद्यावर

### कृषी उत्पन्न बाजार समिती कर्मचारी युनियनच्या बीड जिल्हाध्यक्षपदी परळीतील गोविंद मुंडे यांची नियुक्ती!

**परळी वैजनाथ/प्रतिनिधी**

कृषी उत्पन्न बाजार समिती कर्मचारी युनियन (सिटू संलग्न), महाराष्ट्र राज्य या संघटनेच्या बीड जिल्हाध्यक्षपदी परळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सहाय्यक सचिव गोविंद पाटलोबा मुंडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या नियुक्तीबद्दल संघटनेच्या राज्य पदाधिकाऱ्यांचे आभार व्यक्त करताना, शेतकरी, बाजार समिती कर्मचारी आणि कृषी क्षेत्राशी संबंधित विविध प्रश्न सोडविण्यासाठी आपण नेहमीच प्रामाणिकपणे प्रयत्नशील व कटिबद्ध राहणार असल्याची भावना गोविंद मुंडे यांनी व्यक्त केली.

महाराष्ट्र राज्य कृषी उत्पन्न बाजार समिती कर्मचारी युनियनच्या वतीने दिनांक २० नोव्हेंबर २०२६ रोजी त्यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. संघटनेचे अध्यक्ष कॉ. डॉ. डी. एल. कराड, उपाध्यक्ष कॉ. विजय दराडे, कॉ. संजय पवार, सरचिटणीस कॉ. बळीराम गायकवाड, चिटणीस कॉ. शुभम चितळकर, कॉ. गजानन वटाणे आणि खजिनदार कॉ. कैलास आव्हाड यांच्या स्वाक्षरीने ही नियुक्ती करण्यात आली आहे.



गोविंद मुंडे हे परळी कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये विविध पदांवर कामकाज पाहत असून, सध्या सहाय्यक सचिव म्हणून जबाबदारी सांभाळत आहेत. कै. पंडितआण्णा मुंडे यांच्या आशीर्वादाने तसेच माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे आणि बाजार समितीचे सभापती सूर्यभान (नाना) मुंडे, सचिव बी. आर. रामदासी व सर्व संचालक मंडळ यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी बाजार समितीच्या कामकाजात योगदान दिले आहे. बाजार समिती ही शेतकरी आणि व्यापारी यांच्यातील महत्त्वाचा दुवा असून, शेतकऱ्यांच्या अडीअडचणी समजून घेऊन त्यांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी आपण सातत्याने प्रयत्न केले आहेत. यापुढेही शेतकऱ्यांवर अन्याय होणार नाही, त्यांच्या हिताचे संरक्षण **(पान २ वर)**

## श्रीसंत शिरोमणी मन्मथस्वामी महाराज यांची राज्यव्यापी मेळाव्यास उपस्थित रहा

**परळी वैजनाथ/प्रतिनिधी**

श्री क्षेत्र कपिलधार येथे श्री संत शिरोमणी मन्मथस्वामी महाराज यांची २५ वी शासकीय महापुजा आज दिनांक २४/११/२६ रोजी दुपारी ०४:०० होणार असुन महा-पुजे नंतर शिवा अखिल भारतीय वीरशैव युवक संघटनेचा ३१ वा राज्यव्यापी मेळावा होणार आहे श्री संत शिरोमणी मन्मथ माऊली च्या दर्शनास महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्र प्रदेश येथून ५ ते ६ लाख भाविक दर्शनास येत असतात शिवा संघटनेच्या परंपरानुसार या ठिकाणी मेळावा होत आलेला आहे यावेळी शिवा अखिल भारतीय वीरशैव युवक संघटनेचा ३१ वा राज्यव्यापी मेळावा असुन या मेळाव्या मार्गदर्शन करण्याकरीता गुरुवर्य शिवानंद शिवाचार्य महाराज तमलुरकर,गुरुवर्य राजशेखर गुरु शिवलिंग शिवाचार्य अहमदपुरकर महाराज व अनेक आदरणीय गुरुवर्य आशिर्वाद व मार्गदर्शन करण्याकरीता येणार असुन मेळाव्यास मार्गदर्शन करण्याकरीता महाराष्ट्र राज्याच्या उप मुख्यमंत्री व बीड जिल्हाच्या पालकमंत्री मा ना श्रीमती सुनेत्राताई अजितदादा पवार,जालन्याच्या पालकमंत्री मा ना पंकजाताई मुंडे, माजी मंत्री धनंजय मुंडे, मा ना.बाबासाहेब पाटिल सहकार मंत्री महाराष्ट्र राज्य तसेच शिवा अखिल भारतीय वीरशैव युवक संघटनेचे संस्थापक तथा राष्ट्रीय अध्यक्ष मा प्रा मनोहर धोंडे सर या मेळाव्यास मार्गदर्शन करणार असुन परळी वैजनाथ पंचकोशीतील समाज बांधव व शिवा संघटनेचे पदाधिकारी ,कार्यकर्ते व समाज बांधवाने मोठ्या संख्येने उपस्थित राहावे.

## आई म्हणजे प्रेमाचा सागर-ह्भप सोपान महाराज सानप

**परळी वैजनाथ/प्रतिनिधी**

आई लक्ष्मी जनार्दन मुंडे यांच्या मदतीने माय महोत्सवाचे आयोजित कार्यक्रमाच्या उद्घाटक नगर परिषदेच्या नगराध्यक्ष पद्मश्रीताई बाजीराव भैया धर्माधिकारी, प्रमुख पाहुणे म्हणून परळी नगर परिषदेच्या पाणीपुरवठा सभापती सौ जयश्री ताई रवींद्र पापा गीते, कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी सौ मनीषाताई अजयजी मुंडे यांच्या हस्ते रांगोळी स्पर्धा देवघर माझं सुंदर स्पर्धा तसेच गावातील कर्तुत्वान महिलांचा सत्कार संपन्न झाला. तसेच महाआरोग्य शिबिर चे आयोजन मध्ये डॉ. मधु-सूदन जी काळे ,अस्थिरोग तज्ञ डॉ. पांडुरंग फड ,डॉ. सचिन गित्ते ,डॉ.शशिकांत कराड, डॉ.अशोक लोढा, डॉ .कराड सर ,डॉ. राजेश जाजु,डॉ. बालाजी फड, डॉ. सुजित मुंडे, डॉ. आकाश थोरवे, नेतृतज्ञ डॉक्टर सोळंके साहेब, नेत्ररोग तज्ञ मनीषा तवले, स्त्री रोग तज्ञ म्हणून डॉक्टर कल्पना गित्ते ,विवेकानंद हॉस्पिटल चे सर्व कर्मचारी उपस्थित होते.

आई कधीही न आटणारा प्रेमाचा सागर असते, तिन्ही लोकांचा राजा सुद्धा आईविना भिकारी असतो, असे प्रतिपादन महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध कीर्तनकार श्री ह भ प सोपान महाराज सानप यांनी केले.



परळी तालुक्यातील टोकवाडी येथे डॉ भरत जनार्दन मुंडे , संभाजी भाऊ मुंडे मार्गदर्शक ,महादेव मुंडे, शिवाजी मुंडे व्यवस्थापक संतोष भाऊ मुंडे आणि यांच्या आयोजनामध्ये भव्य स्वरूपाचा माय महोत्सव संपन्न झाला.या कार्यक्रमासाठी विधान परिषदेचे माजी आमदार संजय भाऊ दौंड यांनी माय महोत्सव या कार्यक्रमाला उपस्थिती देऊन आई लक्ष्मी जनार्दन मुंडे यांना उदंड आयुष्य लाभो ही प्रभुवैद्यनाथाच्या चरणी प्रार्थना आई लक्ष्मीबाई जनार्दन मुंडे यांना शत आयुष्य लाभो असे उद्गार त्यांनी काढले. माय महोत्सवाच्या दोन दिवसीय सोहळ्यात पहिल्या दिवशी सर्वरोग निदान शिबिर घेणयात आले ,यावेळी एक हजार रुग्णांनी चाळीस पेक्षा जास्त डॉ. मंडळीच्या उपस्थितीत तपासण्या व औषध-ोपचार घेतले. पहिल्या दिलशी दुसऱ्या सत्रात विविध स्पर्धांचे बक्षीस वितरण करण्यात आले,तसेच भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या अर्धाकृती पुतळ्याचे भूमिपूजन जिल्हा परिषद गटनेते माननीय श्री अजयभाऊ मुंडे ,दिव्याग कल्याण मंत्रालयाचे उपाध्यक्ष डॉ. संतोष मुंडे , परळी पंचायत समितीचे माजी सभापती बालाजी उर्फ पिंटू मुंडे, डॉक्टर राजारामजी मुंडे ,ह भ प तुकाराम महाराज मुंडे शास्त्री, जगदीश महाराज सोनवणे, डॉ. भरत जनार्दन मुंडे, माजी सरपंच मारुती मुंडे, उपसरपंच प्रदीप रोडे, अमर रोडे, दिलीप भालेराव, साहेबराव रोडे, दीक्षित रोडे, संपादक बालासाहेब फड, गणेश मुंडे ,संजय मुंडे, रामेश्वर महाराज कोकाटे, व्यवस्थापक संतोष मुडे इत्यादी कार्यक्रम दिनांक २२ रोजी संपन्न झाले. दिनांक २३ रोजी *माय महोत्सवाच्या* निमित्ताने महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध कीर्तनकार रामायणाचार्य श्री ह भ प सोपान महाराज सानप शास्त्री हिंगोलीकर यांचे सुश्राव्य असे किर्तन संपन्न झाले. किर्तन प्रसंगी बोलताना या चारही भावंडांच्या कामाचे कौतुक महाराजांनी केले. आई वडील मेल्यावर त्यांचे गोड जेवण ,पुण्यतिथी, श्राद्ध करणारे खूप आहेत पण जिवंतपणी आईचा एवढा भव्य सोहळा करणारे तरुण मी पहिल्यांदाच पाहतोय असेही महाराजांनी गौरवोद्गार काढले. या कार्यक्रमाची प्रेरणा घेऊन गावातील तरुणांनी किमान आपल्या मायबापांचा मान सन्मान ठेवला त्यांच्या म्हातारपणात त्यांचा योग्य पद्धतीने सांभाळ केला तरी या कार्यक्रमाचे सार्थक झाले असे म्हणता येईल .गावातील आणि परळी तालुक्यातील तरुणांनी या माय **(पान २ वर)**




जगमित्र हे पत्र मुद्रक, प्रकाशन, मालक, संपादक बालासाहेब जिजाराम कडबाने यांनी जगमित्र ऑफसेट, बाजीप्रभू नगर जवळ नेहरू चौक परळी वै. ता.परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक जगमित्र कार्यालय, 'जगमित्र' बाजीप्रभू नगर नेहरू चौक (तळ) परळी वैजनाथ ४३१५१५ जि.बीड तर दैनिक जगमित्र कार्यालय घर क्र.२०, खडगाव रोड, क्रांतीनगर, विश्वशांती बौध्द विहार जवळ लातूर घर क्र.२२/२० एसटी कॉलनी, बाशी नाका, धाराशिव तनिश ऑर्किड, फेज-२, आर-विंग, ११०५, आळंदी आरडी., चारोली फाटा, ता. हवेली, पुणे ९-२-३४६, बिलाल नगर, देलगूर नाका, इतवारा नांदेड प्लॉट क्र.६६/२ सीटीएस क्र.९०, मयुरी रेसी, महिंद्रा शोरूमच्या मागे, छ.संभाजीनगर रोड, जालना येथे प्रकाशित केले आहे. (दैनिकातील मजकूर बातम्या बाबत संपादक सहमत असतीलच असे नाही.पीआरबी कायद्यानुसार मजकूर निवडण्याची जबाबदारी यांचेवर राहील.) कार्यकारी संपादक : बिलाल शेख मो.नं.९४२२४०४७४०

'Jagamitra' is printed by Balasaheb Jijaram Kadbane (Printer, Publisher, Owner, and Editor) at Jagamitra Offset, near Nehru Chowk, Bajiprabhu Nagar, Parli Vaijnath (Dist. Beed, Maharashtra). It is published from the following locations: 'Jagamitra' Office, Bajiprabhu Nagar, Nehru Chowk (Ground Floor), Parli Vaijnath 431515, Dist. Beed; House No. 20, Khadgaon Road, Krantinagar, near Vishwashanti Buddha Vihar, Latur; House No. 22/20, ST Colony, Bashi Naka, Dharashiv; Tanish Orchid, Phase-2, R-Wing, 1105, Alandi Road, Charoli Phata, Tal. Haveli, Pune; 9-2-346, Bilal Nagar, Delgur Naka, Itwara, Nanded; and Plot No. 66/2, CTS No. 90, Mayuri Residency, behind Mahindra Showroom, Chh. Sambhajinagar Road, Jalna. (The Editor does not necessarily agree with the content or news published in the daily; the responsibility for content selection rests with the designated person as per the PRB Act.) Executive Editor: Bilal Shaikh (Mobile No. 9422404740).

parbhani:Layout 1 11/23/2026 9:32 PM Page 1

महाराष्ट्रातील दैनिक
# जगमित्र

परभणी जिल्हा आवृत्ती | मंगळवार, दि.२४ नोव्हेंबर २०२६ | पान नं.४

## रोजगाराभिमुख कौशल्य प्रशिक्षणाच्या तिसऱ्या टप्प्याचा मंत्री मंगल प्रभात लोढा यांच्या हस्ते शुभारंभ



मुंबई, दि. २३ : औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये राबविण्यात येणारा अल्पमुदतीच्या रोजगारक्षम अभ्यासक्रम कार्यक्रम 'संत रोहिदास अल्पमुदत रोजगारक्षम अभ्यासक्रम कार्यक्रम' या नावाने ओळखला जाणार आहे. उद्योग क्षेत्रातील बदलत्या गरजा आणि रोजगाराच्या नव्या संधी लक्षात घेऊन महाराष्ट्र शासनाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या अल्पमुदतीच्या रोजगारक्षम अभ्यासक्रमांच्या कार्यक्रमाचा विस्तार करण्यात येत आहे. या कार्यक्रमाच्या तिसऱ्या टप्प्याचा शुभारंभ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा यांच्या हस्ते मंत्रालयात करण्यात आला. तिसऱ्या टप्प्यात राज्यातील युवकांसाठी एकूण २६,५२० प्रशिक्षण प्रवेश क्षमता उपलब्ध करून देण्यात आली असून, आतापर्यंत १८,२६६ प्रशिक्षणार्थींनी प्रवेश घेतला आहे. यावेळी ऑनलाईन पद्धतीने अपर मुख्य सचिव मनीषा वर्मा, आयुक्त डॉ.अमित सैनी,व्यवसाय व प्रशिक्षण संचालनालया चे संचालक सतीश सूर्यवंशी,४०० आयटीआयचे प्राचार्य यावेळी उपस्थित होते.

# जनसामान्यांशी नाळ जोडणारे नेतृत्व हरपले; मुख्यमंत्र्यांकडून खा.वडकुते यांना श्रद्धांजली

**परभणी । प्रतिनिधी**

खासदार रामराव वडकुते यांचे आकस्मिक निधन ही अत्यंत धक्कादायक आणि दुःखद घटना आहे. जनसामान्यांमध्ये राहून सर्वसामान्य माणसांशी जिव्हाळ्याचे नाते जपणारे ते लोकाभिमुख नेते होते. त्यांच्या निधनाने मराठवाड्यासह संपूर्ण धनगर समाजाचे मोठे नुकसान झाले असून, एक प्रभावी आणि कर्तृत्ववान नेतृत्व आपण गमावले आहे, अशा शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिवंगत खासदार रामराव वडकुते यांना श्रद्धांजली अर्पण केली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी (दि. २३) परभणी शहरातील कल्याणनगर येथील गोविंद निवास येथे दिवंगत खा. रामराव वडकुते यांच्या पार्थिवाचे अंत्यदर्शन



घेतले. यावेळी त्यांनी पुष्पचक्र अर्पण करून श्रद्धांजली वाहिली. तसेच वडकुते यांच्या कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले आणि त्यांना धीर दिला. यावेळी भावना व्यक्त करताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, रामराव वडकुते हे सर्वसामान्य माणसांशी नाळ जोडलेले आणि लोकांमध्ये रमणारे नेते होते. त्यांचा स्वभाव मनमिळाऊ होता. सामान्य नागरिकांचे प्रश्न ते नेहमीच आपुलकीने आणि तळमळीने मांडत असत. विधान परिषदेचे सदस्य म्हणून त्यांनी उत्तम काम केले. त्यांच्यावर सोपविण्यात आलेल्या प्रत्येक जबाबदारीला त्यांनी यशस्वीपणे न्याय दिला. विशेषतः धनगर समाजासाठी त्यांनी केलेले कार्य उल्लेखनीय होते. समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचून त्यांनी त्यांच्या प्रश्नांना वाचा फोडली. खासदार म्हणूनही त्यांनी आपल्या कार्याचा ठसा उमटवला होता. सर्वसामान्य जनतेमध्ये त्यांच्याविषयी मोठी आत्मीयता आणि विश्वास होता. असे लोकाभिमुख नेतृत्व अचानक हरपल्याने मराठवाड्यासह संपूर्ण धनगर समाजाची मोठी हानी झाली आहे. त्यांचे निधन ही कधीही भरून न येणारी पोकळी आहे, असेही मुख्यमंत्री म्हणाले.यावेळी परभणी जिल्ह्याच्या पालकमंत्री मेघना बोर्डीकर, खा. अशोक चव्हाण, खा. संजय जाधव, आ. रत्नाकर गुट्टे, गोपीचंद पडळकर, बालाजी कल्याणकर, अमरनाथ राजूरकर, परभणीचे महापौर सय्यद इकबाल, जिल्हाधिकारी अण्णासाहेब चव्हाण, पोलीस अधीक्षक पंकज कुमावत, अपर जिल्हाधिकारी शोभा जाधव, उपविभागीय अधिकारी उदयसिंह भोसले यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित वाचा फोडली. खासदार म्हणूनही त्यांनी आपल्या कार्याचा ठसा ेिल कल्याणनगर येथील गोविंद निवास येथे दिवंगत खा. रामराव वडकुते यांच्या पार्थिवाचे अंत्यदशउमटवला होते.दरम्यान, दिवंगत खासदार रामराव वडकुते यांचे रविवारी (दि. २२) नवी दिल्ली येथील एम्स रुग्णालयात हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने वयाच्या ७२ व्या वर्षी निधन झाले.

मंगळवारी दि. २४ नोव्हेंबर रोजी सकाळी १०.३० वाजता हिंगोली येथे त्यांच्या पार्थिवावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत

# .वानाडोंगरी नगर परिषदेत आता सर्वसाधारण सभांचे व्हिडिओ रेकॉर्डिंग सुरू !

**नगरसेवक दीपक बाबुराव नासरे यांच्या निवेदनाला सकारात्मक प्रतिसाद; मुख्याधिकारी राहुल परिहार यांच्याकडूनही अधिकृत दुजोरा**

**प्रतिनिधी/हिंगणा**

वानाडोंगरी नगर परिषदेच्या प्रशासकीय कामकाजात पारदर्शकता आणि उत्तरदायित्व वाढविण्याच्या दृष्टीने एक महत्त्व-पूर्ण निर्णय प्रत्यक्षात येऊ लागला आहे. नगर परिषदेच्या सर्वसाधारण मासिक सभांचे व्हिडिओ चित्रीकरण व रेकॉर्डिंग करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. विशेष म्हणजे, यासंदर्भात नगर परिषद मुख्याधिकारी राहुल परिहार यांच्याकडे विचारणा केली असता त्यांनीही सर्वसाधारण सभांचे व्हिडिओ रेकॉर्डिंग सुरू झाल्याची पुष्टी दिली आहे.नगरसेवक दीपक बाबुराव नासरे यांनी पाच नोव्हेंबर दोन हजार सव्वीस रोजी नगर परिषद प्रशासनाकडे यासंदर्भात सविस्तर कायदेशीर निवेदन सादर केले होते. नगर परिषद कार्यालयातील सीसीटीव्ही यंत्रणा नियमित कार्यान्वित ठेवण्यासोबतच सर्वसाधारण सभा, स्थायी समिती, विषय समित्या आणि इतर अधिकृत बैठकांचे सुरुवातीपासून शेवटपर्यंत व्हिडिओ चित्रीकरण करून त्याचा डिजिटल अभिलेख सुरक्षित ठेवण्याची मागणी त्यांनी केली होती.या निवेदनात सभेतील विषयपत्रिकेवरील चर्चा, नगरसेवकांनी उपस्थित केलेले प्रश्न, सूचना, विकासकामांबाबतची चर्चा, प्रशासकीय निर्णय आणि मंजूर ठराव यांची अधिकृत व्हिडिओ नोंद उपलब्ध राहावी, अशी भूमिका मांडण्यात आली होती. **मुख्याधिकारी राहुल परिहार यांच्याकडून दुजोरा!**

या मागणीच्या अनुषंगाने नगर परिषद प्रशासनाने सकारात्मक पाऊल उचलले असून सर्वसाधारण सभांचे व्हिडिओ शूटिंग व रेकॉर्डिंग सुरू करण्यात आले आहे. मुख्याधिकारी राहुल परिहार यांनीही विचारणा केली असता ही प्रक्रिया सुरू झाल्याचे स्पष्ट केले. त्यामुळे नगरसेवक दीपक नासरे यांनी उप-स्थित केलेल्या पारदर्शकतेच्या मुद्द्याला प्रत्यक्ष अंमलबजावणीच्या माध्यमातून प्रतिसाद मिळाल्याचे दिसून येत आहे.

**आता इतर बैठकांचेही रेकॉर्डिंग होणार का?**

सर्वसाधारण सभांचे रेकॉर्डिंग सुरू झाले असले तरी स्थायी समिती, विषय समित्या आणि इतर अधिकृत बैठकांचेही नियमानुसार व्हिडिओ चित्रीकरण व्हावे, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. तसेच रेकॉर्डिंगचा डिजिटल अभिलेख सुरक्षित ठेवणे, त्याचा बॅकअप तयार करणे आणि नियमानुसार नागरिकांना आवश्यक माहिती उपलब्ध करून देण्यासाठी पारदर्शक कार्यपद्धती निश्चित करणेही महत्त्वाचे ठरणार आहे. नगर परिषद ही नागरिकांच्या करातून चालणारी सार्वजनिक संस्था आहे. त्यामुळे नागरिकांच्या पैशातून होणाऱ्या विकासकामांबाबतचे निर्णय, सभागृहातील चर्चा आणि मंजूर ठराव यांची नोंद सुरक्षित राहणे ही लोकशाहीच्या दृष्टीने महत्त्वाची बाब आहे.दीपक नासरे यांच्या निवेदवानाडोंगरी नगर परिषदेच्या कारभारात पारदर्शकता वाढविण्यासाठी सकारात्मक उदाहरण ठरू शकते. आता या उपक्रमाची ठेवण्यासोबतच सर्वसाधारण सभा, स्थायी समिती, विषय समित्या आणि इतर असातत्याने अंमलबजावणी होते का आणि इतर समित्यांच्या बैठकांनाही हीच व्यवस्था लागू होते का, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

*प्रश्न विचारणारे लोकप्रतिनिधी आणि सकारात्मक प्रतिसाद देणारे प्रशासन, यांच्यातूनच पारदर्शक लोकशाही बळकट होते!*

## रिपब्लिकन सेनेचे राज्य उपाध्यक्ष किरण घोंगडे यांचे राष्ट्रवादीच्या नेत्यांना खुले प्रतिआव्हान; धमक्याऐवजी मुद्द्यावर बोला

**अजित पवारांच्या नावाने राजकीय सहानुभूती मिळवण्यापेक्षा अपघाताच्या चौकशीसाठी ठाम भूमिका घ्या!**

**परभणी/प्रतिनिधी**

स्व. अजित पवार यांच्या नावाचा वापर करून राजकीय सहानुभूती मिळवण्यापेक्षा त्यांच्या विमान अपघाताच्या चौकशीसाठी राष्ट्रवादीच्या नेत्यांनी ठाम भूमिका घ्यावी. अपघातामागील सत्य जनतेसमोर आणण्यासाठी पाठपुरावा करावा, असे खुले प्रतिआव्हान रिपब्लिकन सेनेचे राज्य उपाध्यक्ष किरण घोंगडे यांनी राष्ट्रवादीच्या नेत्यांना दिले आहे.जालना येथे रिपब्लिकन सेनेच्या २८ व्या वर्धापनदिन सोहळ्यात सरसेनानी आनंदराज आंबेडकर यांनी राज्यातील दुष्काळी परिस्थिती, शेतकऱ्यांचे प्रश्न, पाण्याचे नियोजन आणि सरकारच्या धोरणांवर परखड भूमिका मांडली होती. त्यांच्या उपरोधिक विधानाचा मूळ संदर्भ समजून न घेता राष्ट्रवादीच्या काही नेत्यांनी संवेदनशीलतेचे धडे देण्यास सुरुवात केली आहे. एवढेच नव्हे, तर महाराष्ट्रातया जात आहेत. हा प्रकार लोकशाहीतील अभिव्यक्तिस्वातंत्र्यावर घाला घा-लणारा असल्याची टीका घोंगडे यांनी केली.राष्ट्रवादीच्या नेत्यांनी आधी स्वतःच्या राजकीय इतिह-ासाचे आत्मपरीक्षण करावे. पंडित जवाहरलाल नेहरू, इंदिरा गांधी, संजय गांधी आणि राजीव गांधी यांच्या निधनानंतरही विविध राजकीय पक्षांच्या नेत्यांनी त्यांच्या निर्णयांवर टीका केली आहे. स्व. अजित पवार यांच्या विमान अपघातानंतर पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनीही राजकीय कटाची शक्यता व्यक्त करून सर्वोच्च न्यायालयाच्या देखरेखीखाली चौकशीची मागणी केली होती.



त्यावेळी संवेदनशीलतेचे निकष कुठे गेले होते,न अपघात तपास यंत्रणेकडून चौकशी सुरू आहे. या चौकशीचा निष्कर्ष जनतेसमोर यावा, यासाठी राष्ट्रवादीचे नेते किती ठ असा सवाल त्यांनी उपस्थित केला .शरद पवार यांनी छगन भुजबळ, सुनील तटकरे, अमोल मिटकरी, सूरज चव्हाण यांच्यासह अनेकांना राजकारणात संधी आणि व्यासपीठ दिले. मात्र, त्याच नेतृत्वापासून फारकत घेतलेल्या नेत्यांनी आज आनंदराज आंबेडकर यांना संवेदनशीलतेचे धडे देणे हा विरोधाभास आहे. सत्तेसाठी बदललेल्या राजकीय समीकरणांचेही त्यांनी आत्मपरीक्षण करावे, असे घोंगडे म्हणाले.स्व. अजित पवार यांच्या विमान अपघाताची चौकशी व्हावी, अशी मागणी त्यांच्या कुटुंबीयांसह रोहित पवार यांनीही केली आहे. या प्रकरणात बंगळुरू येथे झिरो एफआयआर दाखल करण्यात आली असून, सीआयडी आणि विमान अपघात तपास यंत्रणेकडून चौकशी सुरू आहे. या चौकशीचा निष्कर्ष जनतेसमोर यावा, यासाठी राष्ट्रवादीचे नेते किती ठामपणे पाठपुरावा करीत आहेत, असा प्रश्नही त्यांनी उप-स्थित केला.दुष्काळी शेतकऱ्यांचे प्रश्न, पाण्याचे नियोजन आणि अपघाताच्या चौकशीवर भूमिका स्पष्ट करण्याऐवजी धमक्या देणे योग्य नाही. रिपब्लिकन सेना धमक्यांना घाबरणारी संघटना नाही. राजकीय मतभेद असतील तर त्यांना मुद्द्यांनी उत्तर द्यावे, धमक्यांनी नव्हे, असे आवाहन किरण घोंगडे यांनी केले.

## एक कॉल, प्रॉब्लेम सॉल्व्ह!

**मंत्री मेघना दीदी बोर्डीकर यांच्या तत्परतेने जिंतूर ग्रामीण रुग्णालयाला मिळाला वाहनचालक**

**जिंतूर/प्रतिनिधी**

जिंतूर येथील ग्रामीण रुग्णालयात वाहनचालकाचे पद रिक्त असल्यामुळे रुग्णसेवेत अडथळे निर्माण होत होते. गंभीर रुग्णांना पुढील उपचारासाठी इतर रुग्णालयात हलविणे, रुग्णांना दाखल करण्यासाठी ने-आण करणे तसेच प्रसूती झालेल्या मातांना घरी पोहोचविणे अशा महत्त्वाच्या कामांमध्ये अडचणी येत असल्याची बाब समोर आली होती. या गंभीर समस्येची माहिती राज्याच्या सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री तथा परभणी जिल्ह्याच्या पालकमंत्री मा.ना. मेघना दीदी बोर्डीकर यांच्यापर्यंत पोहोचताच त्यांनी तातडीने दखल घेत संबंधित आरोग्य विभागाला दूरध्वनीद्वारे सूचना केल्या. मंत्रिमहोदयांच्या सूचनेनंतर जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा रुग्णालय परभणी यांनी दिनांक २१ नोव्हेंबर २०२६ रोजी कार्यालयीन आदेश जारी केला आहे. या आदेशानुसार जिल्हा रुग्णालय परभणी येथील वाहनचालक श्री. दगडू एस. श्रोळके यांना पुढील आदेशापर्यंत ग्रामीण रुग्णालय जिंतूर येथे वाहनचालक म्हणून कामकाज करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. विशेष म्हणजे, ग्रामीण रुग्णालयातील वाहनचालकाअभावी रुग्णांना होणारा त्रास लक्षात घेऊन अवघ्या एका दूरध्वनी संदेशानंतर आरोग्य विभागाने प्रशासकीय पातळीवर तातडीने हालचाली करत वाहनचालक उपलब्ध करून दिला आहे.रुग्णसेवेसारख्या अत्यंत महत्त्वाच्या विषयात वेळेवर निर्णय घेतल्यामुळे जिंतूर ग्रामीण रुग्णालयाच्या रुग्णवाहिका सेवेतील अडचणी दूर होण्यास मदत होणार आहे. या निर्णयामुळे परिसरातील रुग्णांना दिलासा मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.एक कॉल... आणि प्रश्न मार्गी! लोकांच्या अडचणींची तातडीने दखल घेऊन प्रशासनाला कार्यवाहीसाठी सूचना देण्याच्या या घटनेची जिंतूर परिसरात चर्चा होत आहे.समोर आली होती. या गंभीर समस्येची माहिती राज्याच्या सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री तथा परभणी जिल्ह्याच्या पालकमंत्री मा.ना. मेघना दीदी बोर्डीकर यांच्यापर्यंत पोहोचताच त्यांनी तातडीना दिलासा मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.एक कॉल... म्हणून कामकाज करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. विशेष म्हणजे, ग्राआणि प्रश्न मार्गी! लोकांच्या अडचणींची तातडीने दखल घेऊन प्रशासनाला सूचना देण्याच्श्री. दगडू एस. श्रोळके यांना पुढील आदेशापर्यंत ग्रामीय जिंतूर येथे वाहनचालक म्हणून कामक

## अपघातग्रस्तांच्या मदतीसाठी सामाजिक कार्यकर्ते शुभम ठाकुर यांची तत्परता;

**आध्या ॲम्ब्युलन्सच्या माध्यमातून जखमींना रुग्णालयात दाखल!**

**प्रतिनिधी/सावनेर**

सावनेरउमरी येथून सावनेरकडे परत येत असताना हेटी चौकीसमोरील नासिर पेट्रोल पंपाजवळ एका वाहनाचा ताबा सुटून वाहन स्लिप झाल्याने अपघात घडला. या अपघाताची माहिती मिळताच सामाजिक कार्यकर्ते तथा शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे सावनेर शहरप्रमुख शुभम भाऊ ठाकुर यांनी क्षणाचाही विलंब न करता घटनास्थळी धाव घेत अपघातग्रस्तांना मदतीचा हात दिला.शुभम ठाकुर यांनी आपल्या आध्या ॲम्ब्युलन्स सर्विसच्या माध्यमातून अपघातग्रस्तांना तातडीने सावनेर येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले. त्यांच्या तत्परतेमुळे जखमींना वेळेत वैद्यकीय उपचार मिळण्यास मदत झाली.अपघाताच्या प्रसंगी माणुसकी जपत मदतीसाठी धावून जाणारे शुभम ठाकुर यांचे कार्य कौतुकास्पद ठरत आहे. सामाजिक बांधिलकी जपत ते सातत्याने अपघातग्रस्त आणि गरजू नागरिकांच्या मदतीसाठी तत्पर असतात.माणुसकी हाच खरा धर्म, तर सेवा हीच खरी समाजसेवा!

शुभम भाऊ ठाकुर सामाजिक कार्यकर्ते व शिवसेना



(उद्धव बाळासाहेब ठाकरे)
सावनेर शहरप्रमुख
आध्या ॲम्ब्युलन्स सर्विस,
सावनेर
संपर्क : ९२८४८७११९५

## शेतकऱ्यांच्या डोळ्यांतील अश्रू पुसणार कोण? ३० नोव्हेंबरला जनावरांसह तहसील कार्यालयासमोर आंदोलनाचा इशारा!

**दुष्काळाने शेतकरी हतबल; जनावरांच्या चारा-पाण्याचा प्रश्न गंभीर,**



**पूर्णा/प्रतिनिधी**

एकीकडे निसर्गाची अवकृपा, दु-सरीकडे आर्थिक संकट आणि त्यातच जनावरांच्या चारा-पाण्याची चिंता... अशा दुहेरी संकटात पूर्णा तालुक्यातील शेतकरी सापडला आहे. शेतात राबराब राबूनही हातात काहीच उरत नसताना आता आपल्या मुक्या जनावरांचे पोट कसे भरायचे, हा प्रश्न शेतकऱ्यांसमोर उभा ठाकला आहे.दुष्काळी परिस्थिती, जनावरांसाठी चारा व पाण्याची व्यवस्था, पीकविमा आणि दुष्काळी मदतीच्या प्रलंबित मागण्यांकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी आनंद सातपुते यांनी तहसीलदार, पूर्णा यांच्याकडे २३ नोव्हेंबर रोजी निवेदन सादर केले आहे. या निवेदनाची प्रत पोलीस निरीक्षक, पूर्णा यांनाही देण्यात आली आहे.शेतकऱ्यांचा संयम संपतोय; ३० नोव्हेंबरला आंदोलनाचा इशारा!शेतकऱ्यांच्या मागण्यांची एका आठवड्यात दखल घेऊन ठोस निर्णय न घेतल्यास ३० नोव्हेंबर रोजी दुपारी १२ वाजता पूर्णा तहसील कार्यालयासमोर शेतकरी व पशुप-ालक आपल्या जनावरांसह शांततामय आणि लोकशाही मार्गाने आंदोलन करणार असल्याचे निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे.आंदोलनादरम्यान कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, वाहतुकीस अडथळा निर्माण होऊ नये आणि कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी योग्य पो-लीस बंदोबस्त उपलब्ध करून देण्याची मागणीही करण्यात आली आहे. शेतकरी हा केवळ अन्नदाता नाही, तर आपल्या कुटुंबासह मुक्या जनावरांच्या जगण्याची जबाबदारीही त्याच्या खांद्यावर आहे. अशा परिस्थितीत त्याच्या अडचणींकडे प्रशासनाने दुर्लक्ष करू नये, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. आता प्रश्न एकच... संकटात सापडलेल्या बळीराजाला दिलासा मिळणार की आपल्या मागण्यांसाठी त्याला पुन्हा रस्त्यावर उतरावे लागणार? याकडे संपूर्ण पूर्णा तालुक्याचे लक्ष लागले आहे.

# परीक्षा आयोजनाच्या दृष्टीने उच्चस्तरीय समितीची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा

**'एनटीए'च्या परीक्षा आयोजनात राज्य शासनाचा सहभाग वाढविण्यावर भर**

मुंबई, दि. २३ : राष्ट्रीय परीक्षा संस्था (एनटीए) आयोजित विविध राष्ट्रीय स्तरावरील परीक्षांचे आयोजन अधिक सुरक्षित, पारदर्शक आणि सुरळीत होण्यासाठी राज्य शासनाचा सहभाग वाढविण्याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत उच्चस्तरीय कृतीदलाचे अध्यक्ष नंदन निलेकणी यांनी चर्चा केली. वर्षा निवासस्थानी झालेल्या या बैठकीस कृतीदलाचे सदस्य डॉ. एस. सोमनाथ, शंकर मरुवाडा, राष्ट्रीय भरती संस्थेच्या (एनआरए) संचालक श्रुती सिंघल आदी उप-स्थित होते. एनटीएमार्फत आयोजित केल्या जाणाऱ्या मोठ्या प्रमाणावरील परीक्षांसाठी राज्यातील उपलब्ध पायाभूत सुविधांचा प्रभावी वापर करणे, प्रत्येक जिल्ह्यात



आवश्यक परीक्षा केंद्रांची उप-लब्धता, परीक्षा केंद्रांवरील मनुष्यबळाचे प्रशिक्षण तसेच परीक्षा आयोजनासाठी आवश्यक लॉजिस्टिक व्यवस्थापन या मुद्द्यांवर बैठकीत सविस्तर चर्चा झाली.राष्ट्रीय स्तरावरील परीक्षांचे आयोजन करताना राज्य शासन आणि परीक्षा घेणाऱ्या केंद्रीय संस्थांमध्ये समन्वयाची प्रभावी यंत्रणा असणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने परीक्षा केंद्रांची उप-लब्धता, केंद्रांवरील सुविधा, प्रशिक्षित कर्मचारी आणि सुरक्षित परीक्षा वातावरण निर्माण करण्यासाठी राज्याची भूमिका महत्वपूर्ण ठरणार आहे. उपलब्ध शासकीय यंत्रणा आणि पायाभूत सुविधांचा यासाठी उपयोग करण्याबाबतही विचारविनिमय करण्यात आला. परीक्षा प्रक्रियेत ग्रामीण आणि शहरी भागातील विद्यार्थ्यांना समान संधी मिळावी, इंग्रजी भाषेची अडचण असलेल्या तसेच दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी परीक्षा अधिक सुलभ व्हावी, यासाठी आवश्यक बदल करण्यावर भर देण्यात आला. परीक्षांमधील विश्वासार्हता कायम राखताना गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी सुरक्षित आणि पारदर्शक यंत्रणा उभारण्याची आवश्यकता व्यक्त करण्यात आली. विद्यार्थ्यांवरील परीक्षेचा ताण कमी करण्यासाठी परीक्षेच्या अधिक संधी उपलब्ध करून देणे, णे आणि स्पर्धात्मक व प्रवेश परीक्षांच्या तयारीसाठी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन व प्रशिक्षण सुविधा उपलब्ध करून देणे, या बाबींचाही आढावा घेण्यात आलाधिक संधी उपलब्ध करून देणे, . एनटीएच्या परीक्षा आयोजनासाठी केंद्र आणि राज्य यांच्यात अधिक प्रभावी समन्वय निर्माण करून विद्यार्थ्यांना सुरक्षित, विश्वासार्ह आणि विद्यार्थी केंद्रित परीक्षा व्यवस्था उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने या बैठकीत चर्चा झाली.

जगमित्र हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक, संपादक बालासाहेब जिजाराम कडबाने यांनी जगमित्र ऑफसेट, बाजीप्रभू नगर जवळ नेहरू चौक परळी वै. ता.परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक जगमित्र कार्यालय, तनिश ऑर्चिड, फेज-२, आर-विंग, ११०५, आळंदी रोड, चरोली फाटा, ता.हवेली, जि.पुणे, महाराष्ट्र ४१२१०५ येथे प्रकाशित केले. (दैनिकातील मजकूर बातम्या बाबत संपादक सहमत असतीलच असे नाही. * पीआरबी कायद्यानुसार मजकूर निवडण्याची जबाबदारी यांचेवर राहील.) इमेल:-jagmitra2010@gmail.com

Jagmitra, this newspaper, is printed, published, owned, and edited by Balasaheb Jijaram Kadbane at Jagmitra Offset, near Bajiprabhu Nagar, Nehru Chowk, Parli Vai., Taluka Parli Vai., District Beed (Maharashtra) and published from the Daily Jagmitra office, Tanish Orchid, Phase 2, R-Wing, 1105, Alandi Rd, Charoli Phata, Ta. Haveli, Dist. Pune, Maharashtra 412105. (The editor may not necessarily agree with the content and news in the daily newspaper. *According to the PRB Act, the responsibility for selecting the content rests with them.) Email:-jagmitra2010@gmail.com